शुक्रवार, ८ मार्च २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १९६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक





●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 8 MARCH 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-196 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05




# शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ, हीच मोदींची गॅरंटी

## शरद पवारांचे पंतप्रधानांवर टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आश्वासन, टीका-टीप्पणी करणे या पलिकडे सरकारने काय केले आहे? शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आलीय, हीच मोदींची गॅरंटी आहे, असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. लोणावळ्यात कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना शरद पवार म्हणाले.

शरद पवार म्हणाले की, लोकशाहीला संकटात नेहणारा कारभार मोदींकडून सुरू असून सामान्य माणसांचे अधिकार उध्वस्त होतील. त्यामुळं लोकशाही आणि घटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे, तुम्ही सर्वांना यात सहभागी व्हायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले की, पक्ष स्थापनेपासून आम्ही विचारधारा कधीच बदलली नाही. जवाहरलाल नेहरुंबद्दल काहीही बोलले जाते आहे. गांधी, सुभाषबाबू, जवाहरलाल नेहरू यांचे योगदान हा देश स्वतंत्र करण्यासाठी होते. अशा लोकांची नोंद जाणकारांनी घ्यायची असते. आज देशाचे पंतप्रधान प्रत्येक दिवशी पूर्ण पान जाहिरात देत आहेत. त्याच मोदींची गॅरंटी देत आहेत, पण ही कोणाच्या पैशाने जाहीरात दिली जात आहे. आज ते सांगत आहेत की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट वाढवतो. गेली दहा वर्षे मोदी सत्तेत आहेत, उत्पन्न वाढले का? उलट शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आणली, हीच मोदींनी गॅरंटी दिली असेही शरद पवार म्हणाले. मविआची बैठक झाली आहे. पुढील आठवडाभरात आम्ही लोकसभेचे उमेदवार जाहीर करू. तुम्ही त्या उमेदवारांना निवडून द्या, तेव्हाच लोकशाहीचे रक्षण होईल असे आवाहन त्यांनी केले. सत्तेचा गैरवापर भाजप करत आहे. झारखंड, दिल्ली या राज्यात तेच घडत आहे. नोटीस, समन्स द्यायचे आणि तुरुंगात टाकायचे, आता

> फॉर्म भरताना पक्षाचे चिन्ह आणि नेत्याची सही लागते ती सही माझी असल्याची आठवणही अजित पवार गटाचे सुनील शेळकेंना यावेळी शरद पवार साहेबांनी करून दिली . त्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांना जे तुम्हाला निवडणूक आणण्यासाठी राबले त्यांनाच तुम्ही दमदाटी करता . त्यामुळे माझी तुम्हाला विनंती आहे की, एकदा दमदाटी केली तेवढी बास पुन्हा असं काही केलं मला शरद पवार म्हणतात एवढं लक्षात ठेवा . मी या रस्त्याने कधी जात नाही मात्र, या रस्त्याने जाण्याची कुणी स्थिती निर्माण केली तर त्याला सोडतही नाही असेही शरद पवार म्हणाले .

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही लवकरच अटक केली जाईल, असेही पवार म्हणाले.

ते म्हणाले की, मुंबईत आदर्श सोसायटीमध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणांचा हात आहे. असा आरोप भाजपने केला. सातव्या दिवशी ते भाजपमध्ये गेले आणि पंधराव्या दिवशी ते भाजपचे खासदार झाले. राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे भ्रष्टवादी पक्ष मोदींनी राज्य सहकारी बँक आणि जलसंपदा विभागात घोटाळा केला. असा आरोप मोदींनी केल्यावर मी म्हणालो हिंमत असेल, तर चौकशी करा. दूध का दूध आणि पाणी का पाणी होऊ दे, पण मोदींनी चौकशी करावी. मात्र घडले काय, ज्यांच्यावर आरोप केले आज ते भाजपमध्ये आहेत. त्यामुळे भाजप म्हणजे वॉशिंग मशीन झालेली आहे. आरोप करा आणि त्यांना पक्ष प्रवेश देऊन आरोप धुवून काढा, असेही शरद पवार यांनी सांगितले आहे. मोदींचे कालचे भाषण पहा, ते बंगालमध्ये होते. तिथं ममता बॅनर्जीवर बोलले. ममता आणि मी एकत्र काम केले. त्यांच्या घरी मी गेलो आहे. मुख्यमंत्री आणि केंद्रात मंत्री असणाऱ्या ममता यांचे घर अगदी छोटे, अशा वाघिणीवर जनता कायम विश्वास ठेवत आली आहे, पण त्या वाघिणीवर मोदी बोलत आहेत, हे कायद्याच्या चौकटीत बसत नाही.

# कलम ३७० बाबत दिशाभूल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काँग्रेस व मित्रपक्षांवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीनगर : कलम ३७० हटविल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी जम्मू आणि काश्मीरच्या दौऱ्यावर पहिल्यांदाच गेले. श्रीनगरच्या बक्षी स्टेडियमवर झालेल्या जाहीर सभेत त्यांनी ६,४०० कोटींच्या विविध विकास प्रकल्पांचे भूमिपूजन केले. यावेळी त्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये मागच्या पाच वर्षांत झालेल्या बदलांचा आढावा घेतला. कलम ३७० हटविल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये विकासाची गंगा कशी पोहोचली? याची माहिती त्यांनी दिली. तसेच कलम ३७० च्या नावावर काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी सामान्य जनतेची कशी दिशाभूल केली, याचीही माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात दिली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक वर्ष कलम ३७० च्या नावावर जम्मू-काश्मीरच्या लोकांची दिशाभूल केली. कलम ३७० मुळे जम्मू-काश्मीरच्या काही राजकीय कुटुंबांनाच फायदा होत होता. आज ३७० नसल्यामुळे जम्मू-काश्मीरच्या युवकांच्या कौशल्याचा सन्मान केला जात आहे. आज जम्मू-काश्मीरच्या प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळत आहे. मागच्या ७० वर्षात इथल्या वाल्मिकी समुदायाला मतदानाचा अधिकार मिळाला नव्हता. इथल्या अनुसूचित जातींना आरक्षण मिळाले नव्हते. ते आता मिळत आहे. अनुसूचित जमातीच्या नागरिकांसाठी विधीमंडळात जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. घराणेशाही असलेल्या पक्षांनी जम्मू-काश्मीरच्या जनतेला अनेक वर्ष अधिकारापासून वंचित ठेवले होते. जम्मू-काश्मीरमध्ये घराणेशाही आणि भ्रष्टाचाराची युती खूप जुनी आहे. 'जे अँड के' बँकेचे दिवाळे काढण्यात घराणेशाही असलेल्या पक्षाने कोणतीही कसर सोडली नव्हती. जवळच्या लोकांना नोकरी लावणे आणि गैरव्यवहार यामुळे बँकेचे कंबरडे मोडले. सामान्य जनतेचे पैसे बँकेत बुडणार होते. त्यामुळे 'जे अँड के' बँकेला वाचविण्यासाठी आमच्या सरकारने अनेक चांगले निर्णय घेतले. चुकीच्या पद्धतीने झालेल्या भरतीविरोधात आम्ही कारवाई केली. आजही या भरतीची चौकशी सुरू आहे.












विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


समर्थ रामदास आणि श्रीराम यांचं नातं म्हणजे दुधात विरघळलेली साखर. वेगळं करता येणं शक्यच नाही. श्रीराम म्हणजे समर्थांचा श्वास आणि ध्यास. हा श्रीरामाचा ध्यास घेऊनच समर्थांनी अगदी बालवयातच घर सोडले.

**रामा तुजकारणे । जिवलगांचा संग सोडला**

असे समर्थ सांगतात. समर्थांना रामाचा जो ध्यास लागला होता, तो एकाएकी निश्चितच नव्हता. समर्थांच्या घरात गेल्या २२ पिढ्यांपासून श्रीरामांची उपासना चालत आली होती. त्याची पूर्वपुण्याई सूर्याजीपंत ठोसर आणि राणूबाई यांच्या पोटी जन्म घेतलेल्या नारायणाच्या पाठीशी होती. समर्थांचा जन्मही चैत्र शुद्ध नवमीच्या दिवशी म्हणजे रामनवमीला झाला. याला केवळ योगायोग म्हणता येणार नाही तर समर्थांच्या हातून पुढे जे धर्मरक्षणाचे आणि रामाच्या उपासनेचे कार्य व्हायचे होते त्याचा हा एक दैवी संकेत होता. श्रीरामांच्या भेटीचा ध्यास घेतलेल्या नारायणाने नाशिकजवळील टाकळीस रामनामाचे पुरश्चरण सुरू केले. बालवयातच पाण्यात उभे राहून त्यांनी कठोर साधना केली आणि प्रत्यक्ष रामरायांचे दर्शन त्यांना घडले. श्रीराम हेच त्यांचे गुरु होते. ते स्वतःला या रामाचा दास म्हणवून घेत. ते म्हणत असत **साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ।श्रीगुरु श्रीरामसमर्थ । काय उणें दासासी ।।**

वेदाध्ययन, विविध ग्रंथांचे अध्ययन, मंदिरातील पुराणश्रवण आदी गोष्टी तर त्यांनी या काळात केल्याच पण सूर्यनमस्कार घालून उत्तम आरोग्य संपादन केले. व्यायाम, उपासना आणि अध्ययन या तिन्ही गोष्टींना समर्थांच्या जीवनात महत्वाचे स्थान होते.समर्थांचे भाग्य एवढे थोर की साक्षात प्रभू रामचंद्राकडून त्यांना मंत्रदीक्षा मिळाली होती. त्यामुळे साहजिकच श्रीराम हेच त्यांचे आराध्यदैवत होते. कुटुंबात रामोपासनेची परंपरा होतीच.



## आनंदी पहाट

# दयाशीलता हे आध्यात्मिकतेचे महत्त्वाचे लक्षण

आधुनिक केसरी

दयेची संकल्पना सांस्कृतिक पातळीवर स्वीकारली जाणे आवश्यक आहे. त्याबाबत स्वारस्य सतत वाढले पाहिजे आणि चित्रपट तसेच कथांशी संबंधित त्यांच्या शीर्षकांमध्ये लोकप्रियता वाढली पाहिजे. प्रवचनात हा शब्द वापरत असताना, सध्याच्या काळात दया म्हणजे काय याचे उत्तर शोधण्याचा आपण प्रयत्न करतो. कादंबरीकार, कार्यकर्ते आणि आध्यात्मिक मार्गदर्शक त्यांचे स्वतःचे स्पष्टीकरण व्यक्त करत असताना, येथे आपण कृतीत करुणा म्हणून दया आणण्यासाठी व्यावहारिक कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. दया ही एक नैसर्गिक मानवी गुणवत्ता आहे, जी आपल्या जीवनाशी आणि सामुदायिक कार्याशी अत्यंत संबंधित आहे. वेदना कमी करण्यासाठी, शांतता आणि न्यायाने एकमेकांशी संबंध ठेवण्याचा हा एक व्यावहारिक आणि प्रभावी मार्ग आहे. दयेचे जाणीवपूर्वक स्वागत आपल्याच आतून उद्भवते. आणि दुःख दूर करणाऱ्या व्यावहारिक, उपयुक्त कृती म्हणून इतर लोकांपर्यंत पोहोचते. दया म्हणजे चूकातून बरोबर बनवणे आणि गुंतलेल्या प्रत्येकाच्या फायद्यासाठी समस्या सोडवणे. कोणत्याही परिस्थितीत, विशेषतः जेव्हा लोक जखमी होतात, तेव्हा आपण दयाळू परिणामाची शक्यता सुधारण्यासाठी साधने आणि कौशल्ये उपलब्ध करू शकतो. समजूतदारपणा, क्षमा आणि उत्तरदायित्वाद्वारे आपण कुठेही असलो, तरी दया मिळविण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी व्यावहारिक टिपांनी परिपूर्ण करणे आवश्यक असते. लढाई जिंकण्याच्या मार्गापेक्षा, दया हा तर्काचा आवाज आहे, जो सहभागी असलेल्या प्रत्येकासाठी बोलतो. दयेचा अनुनय न्याय्य आहे, कारण त्यात सर्व दृष्टीकोन समाविष्ट आहेत. कायदेशीर प्रोटोकॉल, वादविवाद प्रणाली, तुरुंग किंवा शारीरिक शिक्षा यांच्या पलीकडे, फौजदारी न्याय ह्यामध्ये दया हे अन्यायाचे उत्तर आहे. दया आम्हाला शिक्षेशिवाय समस्यांचे निराकरण करून न्याय्य उपाय शोधण्यात मदत करते. दयाळू कृती, जसे की पुनर्संचयित न्याय, सहसा आश्चर्यकारक असतात, सहसा बरे होतात आणि कधीकधी वरवर पाहता चमत्कारी देखील असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## भजे एक चित्ती | पांडुरंगा ||

नसावी आंधळी | निष्ठा श्रध्दा भक्ती ||
अनुभवे शक्ती | सिध्दी व्हावी ||१||
नसावी मुजोरी | यशाच्या प्राप्तीची ||
मिळाल्या किर्तीची | माती होते ||२||
नसावा शेजार |दांभिक खोट्यांचा ||
व्यापार तोट्याचा | करू नये ||३||
असावी समज | आपुल्या कर्माची ||
फलाशा प्राप्तीची | करू नये ||४||
पाळावा स्वधर्म | समाधानी वृत्ती ||
भजे एकचित्त | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### अध्यात्म सोप्या भाषेत


वैराग्य वृत्ती, त्यागपूर्ण जीवनसरणी, अहोरात्र लोककल्याण, नित्य सत्संग मार्गदर्शन, अज्ञानाचे निराकरण, दुःखांचा निचरा, अध्यात्माची तर्कशुद्ध परंतु सोपी मांडणी, सामाजिक सहभाव, केंद्र स्थापना यामुळे दादांना तहान-भुकेचाही विसर पडला. "जीवांत जीव घालावा। प्राणात प्राण। राह-राह शोध घ्यावा। परांतराचा॥" या तळमळीने प. पू. मोरेदादांनी अखंड चाळीस वर्षे प्रश्न घेऊन येणार्या दुःखी-पीडितांचे दुःख-निवारण्याचे कार्य अत्यंत जिव्हाळ्याने केले. सर्वांपर्यंत हा ध्यास, ही तळमळ पोहचावी यासाठी मोरेदादांनी अनेक सेवेकरी घडवून त्यांना विश्वासाने कार्यमग्न केले. जात-पात, धर्म, प्रांत, भाषा, लिंग, श्रेष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब कोणताच भेदभाव दादांनी मार्गात येऊ दिला नाही. 'जे जे भेटे भूत। ते ते मानिले भगवंत॥' अशा उक्तीची सार्थकता त्यांच्या कार्यात सामावलेली होती. त्यांनी महिलांना अध्यात्माचे सर्व अधिकार देऊन संकुचित कुंपणे तोडली. महिलांना आध्यात्मिक सामर्थ्य देण्यासाठी त्यांनी आत्मविश्वास, मार्गदर्शन व शिक्षण दिले. सामान्य जनतेला वेद-वेदांताचे ज्ञान सोप्या मराठीत त्यांनी उपलब्ध करून दिले. त्यासाठी ग्रंथ लिहिले. एवढे करूनही दादांनी कुणाचेही गुरुपद न घेता सेवेकर्यांना "श्री स्वामी समर्थ" महाराजांना गुरुपदी मानायला लावले. अशा प्रकारे दादांनी सामाजिक जीवनात नवे ध्येय, नवे चैतन्य रुजवले. दिव्य गुरुप्रणित मार्गाची जोमाने वाटचाल करून ज्ञानाचा कोंडलेला प्रवाह मुक्त केला. ऋषींचे शाश्वत ज्ञान, संतांचे लोकहितकारी कार्य, विज्ञानाची मांडणी यांचा त्रिवेणी संगम प. पू. दादांनी मार्गदर्शन करून सर्वांना, सर्व पंथांना, सर्वज्ञानाला सामावून घेतले.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्राकृत भूमी पास कर, मरमी भेदी सन्त ।
दिव्य दृष्टि तब खुलत है, सनमुख दृश्य अनन्त ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/३८

मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
अध्यात्मविद् अनुभवी संत जेव्हा योग विधानाद्वारे प्रकृती मंडलास पार करतात, तेव्हा त्यांची दिव्य दृष्टी उघडली जाते आणि त्यांना आत्म्याच्या सन्मुख अनंत सत्तेचा प्रत्यक्ष अनुभव होतो.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# नाम हे सत्स्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते.



आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात्, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते.

४३. नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.

# कल्याण स्वामी

आधुनिक केसरी

कल्याण म्हणाला - 'लोकांपुढे चुकीचा आदर्श ठेवल्यासारखा होईल. 'आपला शिष्य वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ असलेला पाहून समर्थांना कौतुक वाटले .समर्थांनी कल्याणास त्या चोरांना भांडारघरात कोंडून ठेवायला सांगितले. कल्याण अत्यंत बलदंड होते.भलीमोठी काठी हातात घेऊन ते भांडारघरात शिरले. कल्याणांचा रुद्रावतार पाहून सारे चोर घाबरले. समर्थदेखील त्या ठिकाणी पोहोचले.

समर्थ त्या चोरांशी अत्यंत प्रेमाने बोलले. समर्थ म्हणाले, - 'तुम्हाल मी भांडारघरात काम दिले आणि पगार दिला तर तुम्ही चोरी बंद कराल का?' तेव्हा सारे चोर म्हणाले, 'कष्ट करून आमचा संसार चालणार असेल तर आम्ही या क्षणापासून चोरीचा व्यवसाय सोडून देऊ.समर्थांनी त्या सर्वांना चाफळ मठात वेगवेगळी कामे दिली. त्यामुळे त्या चोरांनी समर्थांच्या मठात नवे जीवन सुरू केले.

# तूच आहेस तुझ्या जीवनाची शिल्पकार

आधुनिक केसरी



सौ.तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

**आठ मार्च 'जागतिक महिला दिन' सगळीकडे उत्साहाने साजरा करताना दिसून येतो. कारण आज प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रिया कार्यरत आहेत. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसून येत आहेत. परंतु तरीही महिला दिन साजरा करावा लागतो, हीच मोठी शोकांतिका आहे. एक महिला मग ती आई असो, बहीण, पत्नी, मुलगी असो... जिच्या असल्याने प्रत्येकाचा दिवस उत्साहाने सुरु होतो आणि आनंदाने मावळतो. त्या स्त्रीला मात्र आनंद देण्यासाठी 'दिन' साजरा करावा लागतो. असो...**

या महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनीच थोडा विचार करायला हवा, इतरांसाठी जगता जगता थोडा वेळ स्वतःसाठी काढायला हवा, कारण कुटुंबातील जबाबदाऱ्या ह्या आपल्या श्वासासोबतच संपुष्टात येतील, आपण कितीही नाही म्हटलं तरी- संसार, नोकरी, मुलं ही सगळी तारेवरची कसरत करत असताना आपण स्वतःच्या जबाबदारांमध्ये हरवून गेलो की काय असे वाटायला लागते. सगळीकडे फक्त ओढाताणच सुरू आहे. त्यामुळे शरीर आणि मन दोन्ही तक्रारी करायला लागले आहेत. आपल्याला वाटतं मुलांची परीक्षा होऊ दे... मग बघू, नोकरीच्या ठिकाणाची कामे होऊ दे मग बघू... प्रपंचातील कामे होऊ दे मग बघू... नवरोबांची मर्जी आधी राखू आपले काय नंतर बघू... हे सगळं मारुतीरायाच्या शेपटी प्रमाणे वाढतच जातं, त्याला अंत ठाऊकच नाही. म्हणून म्हणते माय माऊलीनो, स्वतःसाठी दोन क्षण जगा. काही जणी या गोष्टींना अपवाद आहेत. त्या मस्त स्वच्छंदी जगतात, पण त्यांचं प्रमाण अगदी 20%च असेल, बाकीच्या अजूनही जबाबदाऱ्या पूर्ण होण्याची वाट पाहत आहेत. याचा अर्थ असा नाही की, सगळं सोडायचं आणि स्वतःचाच विचार करायचा. उलट सर्व जबाबदाऱ्या आनंदाने प्रेमाने पार पाडायच्या, पण त्यातूनही २४ तासातले दोन क्षण स्वतःसाठी राखून ठेवायचे. अगदी नाहीच वेळ मिळाला तर स्वतःच्या झोपेतला वेळ द्यायचा, पण त्या दोन क्षणांचा आनंद घ्यायचाच. मग पहा शरीर आणि मन किती स्वस्थ राहील, आरोग्याच्या तक्रारी बऱ्यापैकी कमी होतील, स्वतःच आयुष्य वाढेल आणि आपण प्रत्येकाला हवेहवेसे वाटू अगदी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर. मग विचार येऊन गेला असेल असं काय जगायचं... त्या दोन क्षणांमध्ये म्हणजे हे सगळं घडेल कारण प्रत्येक स्त्रीला वाटेल मी जगते बाबा स्वतःसाठी- सकाळी चालायला जाते, योगा करते, वर्षातून एकदा ट्रीपला जाते, अजून काय हवं मला हवं तसं तर जगते की, मी चालायला योगाला जाऊन मुलांच्या डब्याची, शाळेची, आरोग्याची काळजी करणं, महिला म्हणून एकमेकांचे गुणदोष सांगणे म्हणजे स्वतःसाठी आनंदाने जगणं नाही. यावर एक छोटासा प्रसंग आठवला -बागेत पाच महिला नित्यनेमाने चालण्यासाठी जात असत. त्यांच्या बोलण्यात अतिशय आनंद असे, बोलताना विनोदाने हशा पिकला की, खळखळून हसणं व्हायचं. सर्वांना वाटायचं ह्यांचं जीवन किती आनंदी आहे, त्या किती खळखळून हसतात. त्या बागेत आल्या की बागेत एक प्रकारचे चैतन्य असायचे... पण एक दिवस मात्र त्याबागेत आल्या तरी बोलणे नाही, हसणे नाही, सगळीकडे शांतता.! हे एक सदगृहस्थला पहावले नाही, त्यांनी उत्सुकतेने विचारले... काही अडचण आहे का? काही घडले आहे का ? आज एकदम भयान शांतता जाणवत आहे म्हणून विचारले.तेव्हा एक स्त्री म्हणाली आज आम्ही पाचच्या पाचही जणी उपस्थित आहोत ना! हे ऐकल्यावर ते सद्गृहस्थ व बागेतील इतर सर्व मंडळी खळखळून हसायला लागले. तात्पर्य काय इतरांच्या गुणदोषात स्वतःचा आनंद शोधू नका, कारण तो क्षणिक आहे. दोन क्षण जगायचे म्हणजे... उड्या माराव्या वाटतात बिनधास्त मारा, मोठ्याने हसावसं वाटतं, रडावसं वाटतं, बाहेर फिरून यावसं वाटतं, स्वतःच्या आवडीचा छंद जोपासवा वाटतो, गाणं गुणगुणावसं वाटतं, जे वाटतं ते आणि त्यातून स्वतःला भरभरून जगल्यासारखं वाटेल ते... असं जगायचं. एक दिवस घरातली स्वच्छता नाही झाली काही फरक पडत नाही, एक दिवस एक काम अपूर्ण राहिले काही फरक पडत नाही, नाही भांड्यांना चकाकी आली, नाही फरशीला चकाकी आली, तरी चालेल. नाही आरशासारखं घर लक्ख करता आलं तरी चालेल, परंतु स्वतःचं अंतर्मन आनंदाने भरभरून जाण्यासाठी अंतर्मनात उत्साहाचे चैतन्य निर्माण होण्यासाठी भरभरून जगलं पाहिजे, अगदी लहान मुलासारखं. ते दोन क्षण जगत असताना आपल्यालाही अगदी लहान मूलं व्हायचं आहे. एकदम निरागस, निस्वार्थी, जगाशी देणं घेणं नाही, असं बिनधास्त जगायचं. फक्त बिनधास्त, चाकोरी तोडून जगताना इतर कोणाच्या आनंदावर संक्रांत येणार नाही, इतरांच्या अडचणी वाढणार नाही एवढीच दक्षता घ्यायची. मग पहा जादू केल्यासारखे आयुष्य बदलेल, अचानक चमत्कार झाल्यासारखं जग सुंदर भासेल, भरभरून जगावसं वाटेल, आपलीच आपल्याला नव्याने ओळख होईल, स्त्रिया नेहमी इतरांशी बोलतात स्वतःशी कधीच गप्पा मारत नाहीत, स्वतःची गप्पा मारून पहा एक जवळची हक्काची मैत्रीण भेटल्याशिवाय राहणार नाही, इतरांच्या अपेक्षा पूर्ण करता करता स्वतःची कधी उपेक्षा होते ते कळतच नाही कारण पन्नाशीनंतर मुलांच्या पंखात बळ आलं कि, ती पाखरे स्वतःच्या सुखाच्या शोधात कधी भुर्रकन उडून जातील ते कळणार नाही. आता आपल्याला स्वतःकडे पाहायला वेळ नाही आपल्या पन्नाशीनंतर इतरांना आपल्याकडे पाहायला वेळ मिळणार नाही म्हणून आयुष्य जगताना वर्तमानात जगायचं, भरभरून आनंदाने जगायचं कारण "जन हे दिल्या घेतल्याचे" जोपर्यंत काया सुंदर आहे, तोपर्यंत अवतीभवती गर्दी असणार आहे, काया सुरकुतलेल्या पर्वाकडे झुकायला लागली तर जीव ओवाळून टाकणारे पण अंतर ठेवून वागणार आणि त्याचा मनस्ताप होणार म्हणून आपण इतरांच्या आवडीचं आणि सवडीचं नाही बनायचं फक्त उपभोग्य वस्तू सारखंच उपभोगापुरतच नाही राहायचं, येणाऱ्या काळाची ही स्वार्थी वृत्ती व आपल्याला कवडीमोल समजणाऱ्यांपासून लांब राहायचं. क्षणिक कार्य संपन्नतेसाठी, लौकिकासाठी लाचारी नाही पत्करायची कारण आपण आदिशक्ती आहोत. स्वतःचा मान- सन्मान, स्वाभिमान स्वतः जपायचा, तरच इतर जपतील. आज स्त्री घरात व घराच्या बाहेर लढा देताना सक्षम झाली आहे, सशक्त झाली आहे परंतु निर्णयाच स्वातंत्र्य, स्वतःचा कमावलेला पैसा स्वतःसाठी खर्च करण्याचे स्वातंत्र्य खरच आहे का? याचं आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. ज्यांच्याकडे हे स्वातंत्र्य आहे त्यांच्या स्वातंत्र्याचा स्वैराचार झाला नाही ना याचे देखील चिंतन होणे गरजेचे आहे. एका सीतेमुळे प्रत्येक स्त्री पावन झाले नाही, पण एका शृपणखे मुळे संपूर्ण स्त्री बदनाम झाली आहे हे विसरता कामा नये. म्हणूनच म्हटलं स्वतःच्या आनंदाचा सुखाचा विचार करताना इतरांच्या सुखावर विरजन येणार नाही, आपलं कुटुंब विस्कळीत होणार नाही, आपल्या सासर- माहेर नात्या दुरावा येणार नाही, नोकरीच्या ठिकाणी इतरांच्या आवडीचं, सवडीचं बनावं लागणार नाही, एवढीच काळजी घेतली तर घर परिवारच नाही तर, विश्वच सुंदर होईल.

निसर्गाची सर्वात सुंदर रचना म्हणजे प्रकृती आहे. जे निसर्गाने आपल्याला दान वरदान म्हणून दिला आहे त्याचा वसा आणि वारसा चालवत, स्वतःच आणि इतरांचं आयुष्य सुंदर करूयात. आपण जीवन जगत असताना आनंदासाठी कोणती गोष्ट न करता आनंदाने प्रत्येक गोष्ट करूया म्हणजे आपल्या जीवनामध्ये आनंद हा भरभरून राहील. दैनंदिन जीवनातील आनंदवाढीस लागला तर मन आपोआप प्रसन्न राहील आणि मन चिरतरुण, प्रसन्न असेल तर आयुष्य तर वाढेलच परंतु आरोग्य उत्तम राहील. मग ते शरीराचं असो व मनाचं... सर्वात महत्त्वाचं आहे ते मनाचे आरोग्य जपणं कारण देहावर उपचार करून लवकरात लवकर बरं होता येतं, परंतु मनावर उपचार करण्यासाठी खूप काही कालावधी जातो, मन अजून अस्वस्थ होत जातं आणि मन थकलं तरच शरीर लवकर थकत, म्हणून आपण मनाने प्रसन्न राहूया, आनंदी राहूया इतरांसाठी जगता जगता दोन क्षण का होईना स्वतःसाठी जगूया, भरभरून जगूया ह्या जीवनाचा आनंद घेत घेत स्वतःचं व इतरांचंही आयुष्य फुलवूयात... सुगंधित करूयात.

*माय माऊली तू उठ लढ स्वतःसाठी*
*भरभरून जग तुझ्यासाठी*
*तुझ्या प्रवासात ज्यांनी साथ दिली*
*तू ही बन त्यांची सावली*
*ज्यांनी तुला उपभोगाची वस्तू समजली*
*तिथे बिनधास्त भीड स्वाभिमान रक्षणासाठी*
*अग, तू अबला नाहीस, सबला आहेस*
*तू अशक्त नाही, शक्ती आहेस*
*तु लाचार नाही, विचारी आहेस*
*तू अहंकारी नाही स्वाभिमानी आहेस*
*तू स्वैराचारी नाहीस, स्वतंत्र आहेस*
*तू सहनशक्ती नाहीस, नारीशक्ती, आदिशक्ती आहेस, तू बंदिस्त नाहीस, मुक्त स्वच्छंदी आहेस, आज प्रत्येक ठिकाणी तूच तू आहेस...*
*तारेवरची कसरत लिलया पार करते आहेस...*
*तुझ्या असण्यानं समोरच्याच जग बनतं*
*तुझ्या हसण्यानं घरादाराचं चैतन्य फुलतं*
*तुझ्या परिस्पर्शाने कुटुंबाचं सोनं होतं*
*पण ह्या सगळ्या चक्रव्यूहात...*
*तुझा आनंद तुला शोधायचाय*
*तुझ्यातल्या स्त्री शक्तीचा शोध तुलाच घ्यायचाय*
*तुझं स्त्रीत्व तुला जपायचंय*
*कारण... तूच आहेस*
*तुझ्या जीवनाचा शिल्पकार...*

# मुंबईत इंडिया आघाडीचा लोकसभा प्रचाराचा शंखनाद : पटोले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** खासदार राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो न्याय यात्रा १२ मार्चला महाराष्ट्रात प्रवेश करणार असून या यात्रेची तयारी जवळपास पूर्ण झाली आहे. नंदूरबार येथून ही यात्रा महाराष्ट्रात प्रवेश करेल व १७ मार्चला मुंबईत समारोप होणार आहे. मुंबईतील शिवाजी पार्क मैदानात न्याय यात्रेची सांगता सभा होणार आहे. या सभेला इंडिया आघाडीचे नेते उपस्थित असतील व लोकसभा निवडणुकीचा शंखनाद फुंकला जाईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

भारत जोडो न्याय यात्रेच्या तयारीसाठी प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक पार पडली, या बैठकीनंतर पटोले प्रसार माध्यमांशी बोलत होते, ते पुढे म्हणाले की, नंदुरबार ते मुंबई या प्रवासात अनेक कार्यक्रम होतील व त्यासाठी त्या-त्या भागातील नेत्यांना जबाबदाऱ्या दिल्या आहेत. शिवाजी पार्क मैदानावर सभा घेण्याची परवानगी मागितली आहे. शिवाजी पार्क मिळेल अशी अपेक्षा असून राज्य सरकार अश्यात राजकारण करणार नाही अशी आमची अपेक्षा आहे. भारत जोडो न्याय यात्रा छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या भूमीत येत आहे. या महापुरुषांच्या विचारांना संपवण्याचे काम केंद्र व राज्यातील भाजपा सरकार करत आहे. भाजपा लोकशाही व संविधान संपवायला निघाले आहे परंतु त्यांना जशास तसे उत्तर देण्याची आमची तयारी आहे.

भारतीय जनता पक्षात आता सक्षम उमेदवार नाहीत म्हणून तर ते दुसऱ्या पक्षातील नेते चोऱ्या करून व दबावाने पळवत आहेत. भाजपाचे दोन कार्यकर्ते ईडी व सीबीआयही यासाठी कामाला लागले आहेत. भाजपा आता मोदी परिवार झाला असून जिंकण्याचा विश्वासही त्यांच्यात राहिलेला नाही. राष्ट्रीय नेतृत्व म्हणणाऱ्या नितीन गडकरी यांना उमेदवारी मिळेल की नाही हीच शंका आहे. भाजपाच्या पहिल्या यादीत या राष्ट्रीय नेतृत्वाचे नाव असायला पाहिजे होते पण नाही. नागपूरसाठीही काँग्रेसकडे सक्षम उमेदवार आहे व यावर्षी विजयी पताका फडकवू तसेच सांगलीची जागासुद्धा काँग्रेस लढणार आहे, असे नाना पटोले म्हणाले.

आजच्या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षाताई गायकवाड, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, सुनील केदार, अस्लम शेख, अमित देशमुख, आदिवासी काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव मोघे, खासदार चंद्रकांत हंडोरे, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, AICC चे सचिव आशिष दुआ, बी. एम. संदीप, आ. प्रणिती शिंदे, खजिनदार डॉ. अमरजितसिंह मनहास, आ. भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे आदी उपस्थित होते.

# पाणीटंचाई भासणार नाही याची अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी : आमदार शामसुंदर शिंदे

## लोहा येथे आ. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संभाव्य पाणीटंचाईबाबत आढावा बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**



**लोहा :** पंचायत समिती कार्यालय लोहा तालुक्याच्या वतीने काल दि.०७ मार्च गुरुवारी लोहा तहसील कार्यालयात उन्हाळी संभाव्य पाणीटंचाई आढावा बैठक लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर व लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आडेराघो यांच्या हस्ते आमदार शामसुंदर शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आडेराघो, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंद्रसेन पाटील गौडगावकर, शेकापचे नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे, खरेदी-विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार,पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्रीराम डिकळे ,जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता शिवाजी राठोड,, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पवार, संचालक सुधाकर सातपुते, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, संचालक विश्वंभर पवार, शेकाप लोहा तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल सह सर्व विभागाचे विभाग प्रमुख, पदाधिकारी ,कार्यकर्ते ,कर्मचारी उपस्थित होते, यावेळी आमदार शिंदे यांनी पाणीपुरवठा विभागासह सर्व विभाग प्रमुखांचा विस्तृत आढावा घेतला, यावेळी इंधन विहीर ,अधिग्रहण, नवीन नळ योजना व नळदुरुस्ती, जलजीवन मिशन अंतर्गत चा पाणीपुरवठा आणि टँकर नवीन बोरवेल यासह सर्व संभाव्य पाणीटंचाई उपायोजना बाबी विषयी आमदार शिंदे यांनी उपस्थित प्रमुख अधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चा करून संबंधित विभाग प्रमुखांना सूचना केल्या, यावेळी बैठकीत अधिकाऱ्यांशी बोलताना आमदार शिंदे म्हणाले की तालुक्यात संभाव्य पाणीटंचाईला समोर जाण्यासाठी ज्या काही उपाययोजना व पाणी टंचाई निवारणार्थ नवीन प्रस्ताव असतील तर संबंधित अधिकाऱ्यांनी ते प्रस्ताव वेळेत दाखल करावेत मी त्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणार असून लोहा तालुक्याला संभाव्य पाणीटंचाई चा सामना करावा लागणार नाही यासाठी प्रमुख अधिकाऱ्यांनी तात्काळ उपयोजना करण्याचे निर्देश आमदार शिंदे यांनी प्रमुख अधिकाऱ्यांना दिले ,पाणी टंचाई सारख्या अत्यंत महत्त्वाच्या कामात अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्यास संबंधित अधिकाऱ्यांची कदापी गयी केली जाणार नसल्याचेही यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना खडसावले, उन्हाळ्यात सर्वसामान्य जनतेसह गुराढोरांना मुबलक पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्परता बाळगण्याचे निर्देश यावेळी आमदार शामसुंदर शिंदे यांनी पाणी टंचाई आढावा बैठकीत सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना दिले.

## तिढा सुटेना

आधुनिक केसरी

भाजपाला पराभूत करण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या इंडिया आघाडीला एकापाठोपाठ एक धक्के बसताना दिसत आहेत. अनेक राजकीय पक्षांनी इंडिया आघाडीतून बाहेर पडत स्वतःची वेगळी वाट धरली आहे. लोकसभा निवडणुकांच्या तारखा कधीही जाहीर होऊ शकतात अशा परिस्थितीतही इंडिया आघाडीचा जागावाटपाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. त्यामुळे अनेक पक्ष स्वबळाचा नारा देत आहेत. आसाम तृणमूल काँग्रेसनेदेखील लोकसभा निवडणुकीसाठी स्वतःचे उमेदवार उभे करण्याची तयारी सुरू केली आहे. आसाम तृणमूल काँग्रेसचे प्रमुख रिपुन बोरा यांनी बुधवारी सांगितले की, आसाममध्ये इंडिया आघाडीसोबत जागावाटप होण्याची शक्यता कमी आहे. पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी स्वतःचे चार उमेदवार उभे करण्याची तयारी करत आहे. आसाम तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आसाममधील काँग्रेसच्या नेतृत्वाखालील १६ पक्षीय संयुक्त विरोधी मंचाचा अर्थात युनायटेड आपोझिशन फोरमचादेखील एक भाग आहे; जो केंद्र सरकारचा नागरिकत्व दुरुस्ती कायदा, २०१९ लागू करण्याच्या विरोधात आहे. आसाममधील १४ लोकसभा जागांपैकी धुबरी, लखीमपूर, कोकराझार आणि करीमगंज या चार जागांवर तृणमूल काँग्रेस उमेदवार उतरवण्याच्या तयारीत आहे. निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची पहिली बैठक आज होणार आहे. रिपुन बोरा यांनी २०२२ मध्ये काँग्रेस पक्ष सोडून टीएमसीमध्ये प्रवेश केला होता. ते म्हणाले की, आघाडीत जागावाटप होईल की नाही याची प्रतीक्षा करू. परंतु, शक्यता खूपच कमी आहे.

"जर पश्चिम बंगालमध्ये जागावाटप होत नसेल तर आसाममध्येही जागावाटप होणार नाही. आमच्या ऐकण्यात आले आहे की, आसाम काँग्रेस त्यांच्या उमेदवारांची यादी ८ मार्चला जाहीर करणार आहे. परंतु, जागावाटपासंदर्भात आमची अंतिम बैठक झालेली नाही. जागावाटपाची शक्यता कमी वाटत असल्याने आम्ही स्वबळावर लढण्याची तयारी केली आहे. निवडणुकांना खूप कमी दिवस शिल्लक आहेत, वाट पाहण्यासाठी आणखी वेळ नाही", असे बोरा यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले. फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात टीएमसी नेते डेरेक ओ ब्रायन म्हणाले होते की, आगामी निवडणुकीत त्यांचा पक्ष एकट्याने उतरणार आहे. लोकसभेसाठी पश्चिम बंगालमधील सर्व ४२ जागा, आसाममधील काही जागा आणि मेघालयातील एक जागा लढवण्याच्या पक्षाच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही, असे त्यांनी सांगितले होते. इंडिया आघाडीतील आम आदमी पार्टीनेदेखील आसाममध्ये आपल्या तीन उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.

## कर्तृत्ववान महिलांची संघर्षगाथा : राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू

आधुनिक केसरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

**कठोर परिश्रमातून पुढे आलेली माणसे समजूतदार असतात त्यांच्या जाणिवा प्रगल्भ झालेल्या असतात, सामाजिक ,शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात मानाची पदे लाभूनही काही माणसं साधी, सरळ मार्गी जमिनीवर पाय ठेवून व्यवस्थित चालणारी असतात. कसल्याही पद्धतीचा अहंकार नाही. साधी राहणी व उच्च विचारसरणी असते, नेहमी समाजाचं कल्याण व्हावं अशी अपेक्षा ठेवणारे व्यक्ती समाजात मोठी होत असतात. सर्वांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व म्हणजेच आपल्या देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्याचा लेखाजोखा या लेखात घ्यायचा आहे.. त्यानिमित्ताने केलेला हा लेखन प्रपंच...**

भविष्याचा अचूक वेध घेत वाटचाल करणाऱ्या व्यक्ती बोटावर मोजण्या इतक्याच असतात. अशा व्यक्तीमध्ये अग्रणीय नाव असणारे व्यक्तिमत्व म्हणजे उपेरबेडच्या संघर्ष कन्या देशाच्या15 व्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मूर्मू ह्या आहेत. 26 जानेवारी 1950 रोजी आपला देश प्रजासत्ताक झाला आणि प्रजेच्या हाती सत्ता सुरू झाली त्यामुळे राष्ट्रपतीपद उदयास आले,पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील आणि दुसऱ्या महिला राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मूर्मू या कर्तुत्वान महिला आहेत.काही माणसं स्व कर्तुत्वावर मोठी झाली आहेत. त्यांचा जीवन प्रवास खडतर होता,

संघर्षाच्या आणि संकटाच्या वाटा त्यांच्यासाठी काटेरी होत्या, नेहमी त्यांची सत्वपरीक्षा घेत होत्या, तरीही या संघर्ष कन्येने संपूर्ण संकटावर मात केली, प्रचंड ध्येयवाद, दुर्दम्य इच्छा शक्ती अथक परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर त्यांनी मोठी झेप घेतली, आणि त्या देशाच्या राष्ट्रपती झाल्या, संघर्षाच्या वाटेवर चालून त्यांनी फुलाच्या पायघड्या तयार केल्या ,त्यामुळे त्यांचा सुगंध सर्वत्र आज दरवळत आहे. हे मला अभिमानाने सांगावे वाटते ,ही गोष्ट आपल्या तरुण-तरुणींना प्रेरणादायी ठरली आहे , संकटाची मालिका त्यांच्यावर येऊन घरातील तीन व्यक्ती मृत्यू पावले, पण त्या थोड्या सुद्धा खचल्या किंवा डगमगलेल्या नाहीत, जीवनातील वास्तवता लक्षात घेऊन ध्येयवादी प्रवृत्तीने कार्य करणाऱ्या व येणाऱ्या अडचणीला हसत हसत त्या तोंड देत आहेत. वास्तवता स्वप्न ,सृष्टी व हास्यरस या तिन्ही गोष्टीचे एकत्र मिश्रण म्हणजे ज्ञान होय, हे जीवनाचे गणित आज मान्य आहे, जीवनात अनेक सुखाचे क्षण येतात ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे सतेज असतात, नंतर भडक होतात तसे त्यांची जीवन तेजोमय झालेले आपल्याला दिसते, महामहीम द्रौपदी मूर्मू यांचा जन्म 20 जून 1958 रोजी ओरिसातील मयूरभंज जिल्ह्यात संथाळ या आदिवासी कुटुंबात झाला, त्यांच्या वडिलांचे नाव नारायण दुडू होते, महाविद्यालयीन शिक्षण भुवनेश्वर मधील रमादेवी महिला महाविद्यालयात झाले, पुढील काळात त्या सहाय्यक लिपीक झाल्या, त्यानंतर त्या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या, राजकारणात त्या 1997 मध्ये प्रवेश केल्या, सुरुवातीला नगरसेविका म्हणून कार्यरत होत्या, त्यानंतर रायरंगपूरच्या आमदार झाल्या. पुढे त्यांना बीजेडी सरकार मध्ये मंत्रिपद मिळाले आणि नीलकंठ पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले, ध्येयाचा ध्यास लागला की कामाचा त्रास होत नाही म्हणतात.

तसे त्या झारखंडच्या पहिल्या महिला नवव्या राज्यपाल म्हणून, 18 मे 2015 ते 12 जुलै 2021मध्ये कार्यरत होत्या,. त्यानंतरच्या काळात त्या भरघोस मतांनी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्या, त्या सर्वात कमी वयाच्या राष्ट्रपती आहेत हा विजय संपूर्ण आदिवासी समाजासाठी व भारतीयांसाठी परिवर्तनवादी ठरला.

शिक्षणात किती सामर्थ्य असते हे या विजयाने दाखवून दिले. म्हणून शिक्षण शिका शिक्षण नाही शिकले तर इतके अनर्थ एका अविद्याने केले, असे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात श्रमाला फळ मिळाले,भेदभावांचा अंत झाला. जातीयता येथे नष्ट झाली. कर्तुत्वाला फळे आली. जे कर्तृत्व करतात ते खरोखरच यशोशिखरावर जातात, अशी जनसामान्यांमध्ये चर्चा होऊ लागली, म्हणूनच कर्तुत्वान महिलांची संघर्षगाथा आपण अभ्यासत व शिकत आहोत, व्यक्ती कोणत्या जातीत जन्मला हे महत्त्वाचे नसून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे, हे छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आम्हाला आजही प्रेरणादायी आहेत, म्हणून शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, हे सुद्धा आम्हाला कळाले म्हणून महिला दिनाच्या निमित्ताने अशा गुणवंत व कर्तुत्वान महिलांचे प्रेरणादायी विचार आपण समाजा समोर ठेवावेत, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपण पुढे जावेत, त्यासाठी लेखन ,वाचन, चिंतन, संभाषण फार महत्त्वाचो आहे. घरामधील त्यांची मुले, पती वेगवेगळ्या कारणामुळे मृत्यू पावले त्यांनी त्यांचे दफन घरामध्येच केले, आणि त्या ठिकाणी आज विद्यालय बांधण्यात आले, एका बाजूला आपण अंधश्रद्धा पाळतो तर दुसऱ्या बाजूला त्या घराला विद्यामंदिर म्हणून नावारूपाला आणले, हे येथे सांगावयाचे आहे. आपल्या जीवनभराच्या प्रवासात त्यांनी कधीही कोणावर रागावलेल्या नाहीत.

पाठीमागचा इतिहास पाहिल्यानंतर त्यांची कर्तुत्व अतिशय मोठी आहेत. इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी हे कार्य केलेले आहे. वास्तविकता त्यांच्याकडून आपला शिकता येईल. कष्टकऱ्यांच्या ,कामकरी,लोकांच्या जीवनाची गाथा काय असते? हे त्यांनी सांगितलेलं आहे. जाणिवांची प्रगती आणि समाजाची पुनर्वस्था ,पुनर्रचना यासाठी शिक्षण हे एक मूलभूत साधन आहे. म्हणून शिक्षण शिका? असे त्यांना सांगायचे आहे त्या नेहमी पुस्तके जवळ ठेवतात. आणि वाचन करत असतात. हे या ठिकाणी आवर्जून सांगावे वाटते.

आजकालचे तरुण म्हणतात 'आम्हाला वेळ मिळत नाही. वाचन करण्यासाठी ज्या पदावर आज त्या आहेत ते पद सांभाळून सुद्धा वाचन करीत असतात हे वाखाण्याजोगी गोष्ट आहे, यत्र नार्यस्तु पुजन्यते ।रमते तत्र देवता। जिथे स्त्रिया पूजनीय होतात, तेथे देवत्व प्राप्त होते असा संस्कृत श्लोक म्हटला जातो. ते सर्व वास्तविक आहे ज्यांना आईचे बहिणीचे महत्त्व कळाले ते यशस्वी झाले, पत्नी ही क्षणाची असून अनंत काळाची माता आहे. असे विचारवंतांनी म्हटलेले आहे.म्हणून महिलांचा नेहमी आदर करायला शिका ,महिला या कोमल आहेत पण कमकुवत नाहीत. याची जाणीव असू द्या .प्राचीन काळातील महिला आणि आजची 21 व्या शतकातील महिला यामध्ये जमीन, अस्मानचे फरक आहे,

त्यासाठी महिला या अबला नसून सबला आहेत .हे तुम्ही लक्षात घ्या. आज सर्वत्र शैक्षणिक वातावरण तयार झालेले आहे ,त्यामुळे खूप मुली शिक्षण शिकत आहेत, मोठमोठे पद पादाक्रांत करीत आहेत. शिक्षण,क्रिकेट, ऑलिंपिकच्या स्पर्धा, गिर्यारोहण, राजकारणातील सर्वच पदे या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या यशाच्या संघर्ष गाथा आपण अभ्यासणार आहोत. आठ मार्च महिला दिनाच्या निमित्ताने आपण काही शूरवीर ,रणरागिणी ,दुर्गा महिलांची माहिती पुढील लेखात घेणार आहोत.



## महिलादिन आणि सौंदर्य

आधुनिक केसरी

**आज जागतिक महिला दिन. म्हणजेच 'ती' चा दिवस. हो तीच 'जिला आपण चूल आणि मूल' हे कार्यक्षेत्र देऊन रिकामे होतो. आपल्या आयुष्यात आई,पत्नी,बहीण,मैत्रीण अशा विविध नातेसंबंधातून ती घरादाराशी जोडली जाते. जिचे वर्णन करताना साक्षात देवीच्या रूपांचीही उपमा दिली जाते. होय आजचा दिवस हा फक्त आणि फक्त तिचा आहे. आज 'ती' कोणत्याच बाबतीत पुरुषांच्या मागे नाही. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून ती आज प्रत्येक क्षेत्रांत सक्षमपणे उभी आहे. ती कोणत्याच बाबतीत पुरुषांपेक्षा मागे नाही. परंतु असे असले तरी तिच्यामध्ये त्या निर्मात्याने काही विशिष्ट क्षमता भरलेल्या आहेत. आणि यामुळेच तिने तिचे वैविध्य जपून ठेवले आहे. तिला लाभलेले एक अद्वितीय वरदान म्हणजे तिचे सौंदर्य. सौंदर्य म्हटलं की डोळ्यासमोर येते ते स्त्रीचे नटणे,सजणे आणि आकर्षक दिसणे.**

आणि यासाठी प्रत्येक स्त्री आग्रही असते. सौंदर्य हे अनेक गोष्टींत असते. निसर्गात, सूर्योदयात, सूर्यास्तात आणि निसर्गाच्या अनेक कलाकृतीतून ते दिसत असते. परंतु एवढे सर्व असले तरी स्त्री म्हणजे सौंदर्याची खाण असे आवर्जून म्हटले जाते. हल्ली सुंदर दिसण्यासाठी अनेक ट्रीटमेंट्स किंवा लेडीज ब्युटी पार्लर्सचा आधार घेतला जातो. यात अनेक प्रकारच्या उपचार पद्धती आणि सौंदर्य प्रसाधने वापरली जातात. यासाठी सध्याचा मीडिया अनेक प्रोडक्टचे उत्तम मार्केटिंग देखील करत आहे. परंतु यातून मिळणारे सौंदर्य हे क्षणिक किंवा तात्पुरते आहे. एक महिला ब्युटिशियन म्हणून हे मत मांडणे म्हणजे स्वतःच्या बिजनेसवर स्वतः कुऱ्हाड मारण्यासारखे आहे. परंतु सोशल मीडियाच्या सुपरफास्ट जगात प्रत्येकाला स्वतःला दाखवायचे आहे. प्रसिद्ध व्हायचे आहे. आपले कोणीतरी कौतुक करावे असे वाटत आहे. आणि त्यामुळेच मॅगीप्रमाणे बदलत झालेल्या या इन्स्टंट जमान्यात कॉन्स्टंट राहण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

माझ्याकडे सौंदर्योपचारासाठी येणाऱ्या अनेक स्त्रिया या नेहमी पर्मनंट इफेक्ट बाबत विचारणा करत असतात. अशी काही ट्रीटमेंट सांगा किंवा प्रोडक्ट सांगा जे मला पर्मनंट रिझल्ट देईल. त्यावेळी मी त्यांना आवर्जून सांगते की अशी कोणतीही पर्मनंट नैसर्गिक पद्धती अजून तरी अस्तित्वात नाही. यासाठी एक गोष्ट आहे जी कदाचित तुमच्या अपेक्षा काही प्रमाणात का होईना नैसर्गिकरित्या पूर्ण करू शकते. आणि ते म्हणजे तुमची इच्छाशक्ती आणि तुमची कृती. आज केलेला मेकअप , हेअरस्टाईल किंवा इतर पद्धती तुम्हाला काही काळाकरिता नक्कीच आकर्षक बनवू शकते. परंतु कपड्यांचा रंग उतरावा तसा तुमच्या आकर्षकतेचा रंग आज ना उद्या उतरणार आहे. आणि तो उतरला की तुम्ही परत तेच करून आकर्षित दिसण्याचा प्रयत्न करत असाल तर हे योग्य नाही. यातून तुमच्या त्वचेवर, शरीरावर दूरगामी प्रतिकूल परिणाम होण्याचा संभाव्य धोका नक्कीच आहे. आणि म्हणूनच कधीतरी सण,उत्सवाला, समारंभाला आणि कार्यक्रमांना अशा ट्रीटमेंट आहे. परंतु त्याची सवय न होऊ देणे ही देखील आपली जबाबदारी आहे. मग यासाठी काय करायचं तर निसर्गाने, आयुर्वेदाने आपल्याला जे जे दिलेलं आहे त्याचा अधिकाधिक लाभ आपण घ्यायला हवा. आपण आपल्या दैनंदिन सवयी बदलल्या पाहिजेत. कुटुंबाला आणि जबाबदाऱ्यांना वेळ दिल्यानंतर मोबाईलला वेळ देण्यापेक्षा स्वतःसाठी वेळ द्यायला हवा. त्वचा नेहमी तजेलदार आणि टवटवीत दिसण्यासाठी संपूर्ण शरीराला हायड्रेट करणे गरजेचे आहे. आणि यासाठी उत्तम उपचार म्हणजे भरपूर पाणी पिणे. आपण दररोज किमान १३-१४ ग्लास पाणी प्यावे. आपल्याला सकस आहार पाळावा लागेल जेथे सर्व तेलकट, मसालेदार, फास्ट फूड पदार्थ शक्यतो टाळले पाहिजेत. नेहमी सर्व हंगामातील फळे खाण्याचा प्रयत्न करा. नैसर्गिक चमकणाऱ्या निरोगी त्वचेसाठी तुम्ही दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम केला पाहिजे. यात योगा,प्राणायाम,सूर्यनमस्कार, जिम यासारखर व्यायाम केले पाहिजेत. तसेच सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पुरेशी झोप . आपण दररोज किमान ७-८ तास झोपले पाहिजे. हे तुमचे आरोग्य तसेच मन ताजे आणि सक्रिय ठेवेल. आणि या सौंदर्याला झळाळी देणारा दागिना म्हणजे सतत आनंदी राहणे. चेहऱ्यावर हास्य आणि मनातून आनंदाची भावना तुमचे मन आणि चेहरा दोन्ही उजाळते. अशा छोट्याछोट्या गोष्टी आजच्या या धावपळीच्या युगात काटेकोरपणे पाळल्यास नक्कीच फरक जाणवायला लागेल. आज महिला दिन आपल्या सर्व माता भगिनींसाठी उत्सवाचा दिन. आज आपण सर्वजण छान नटून-थटून फोटो काढू, आनंद व्यक्त करू. स्वतःला आकर्षित आणि सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करूच. पण आता आपला प्रत्येक दिवस हा महिला दिन असल्याप्रमाणे सेलिब्रेट करता आला पाहिजे. आणि यासाठीच आपल्याला बाह्य सौंदर्यासोबतच अंतरीचे सौंदर्य खुलविण्याचाही प्रयत्न केला पाहिजे. सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !

सौ. तृप्ती ननावरे
9762966999

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जावे 'स्त्री'च्या वंशा तेंव्हा कळे !

आधुनिक केसरी

आज जागतिक महिला दिन! परंतु एखादा दिवसच महिला दिन असू शकतो का? आजच्या दिवशी शुभेच्छा देऊन मोकळे होता येईल काय? याकडे थोडंस बारकाईने जर पाहिलं तर रोज दिवस तिचाच तर असतो...सुरु झाडझुड अन पोळी-भाजीने अन पसारा आवरण्याने संपतो नेमका तिचा कोणता दिवस नसतो? असे प्रश्न मनाला सतावत असतात. त्यातील काही प्रश्न म्हणजे तिच्याच माथी एवढी बंधने, कामे का? अगोदरच निसर्गाने अनेक जास्तीच्या आणि जीवघेण्या शारीरिक जबाबदाऱ्या सोपवून तिच्यावर प्रचंड अन्याय केला आहे. खरंच मानवांचा निर्माता देव असेल तर, "त्या देवाला तिची काहीच कशी दया आली नाही? का तो ही पुरुष असल्यामुळे मुद्दाम तिच्यावर जास्तीची जबाबदारी लादली?" खरंच पितृसत्ताक व्यवस्थेने जगात एकमेव सृजनत्व असणाऱ्या आईला किती बंधनात अडकवले आहे?



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

हिंदी सिनेमातील  जहाँ पाँव में पायल हाथ में कंगन, हो माथे पे बिंदिया इट हैपंस ओनली इन इंडिया हे गाणं भरपूर गाजलं. अक्षरशः अनेकांनी ते गाणं डोक्यावर घेऊन नाचले! पण हे गाणं माझ्या डोक्यात बसलं. यातील अभिनय, नृत्य वगैरे सर्व काही ठीक होते परंतु याचे बोल मात्र इथल्या स्त्रीला गुलाम करणाऱ्या परंपरेचे गुणगान करणारे असल्यामुळे ते काही मनाला पटले नाही. हे म्हणजे एकीकडे डॉक्टरने रोग्यांना, "हे खावू नका, ते खावू नका असे सांगायचे" आणि जातांना औषध म्हणून "विष द्यायचे" असं झालं! आज भारतात एकीकडे स्त्री स्वातंत्र्य, समानता, समान काम समान वेतन, महिला आरक्षण इत्यादींच्या वल्गना केल्या जातात आणि दुसरीकडे तिला प्रत्यक्षात एकही अधिकार न देता कोऱ्या चेक आणि कागदावर तिच्या सह्या घेतल्या जातात! "स्त्री म्हणजे घराची अब्रू. ती बाहेर फिरली नाही पाहिजे!" या गोंडस वाक्याखाली तिला स्वातंत्र्य द्यायचे नाही. बाहेरचे जग, स्वातंत्र्य पाहू द्यायचे नाही. तिला घरात बंदिस्त ठेवायचे! इज्जत केवळ स्त्रीनेच सांभाळायची आणि पुरुषांनी मोकाट वागायचे! ही कसली संस्कृती? ही तर घाणेरडी विकृती! एवढेच काय, अनेक ठिकाणी संवैधानिक पदांवर स्त्रिया असतांना त्यांचे नवरे खुशाल कारभार पाहतात. लोकही प्रश्न उपस्थित करत नाहीत. त्या पदांवरील स्त्रियांचे नवरेच अक्षरशः खोट्या सह्या मारून बिनधास्त व्यवहार करतात. बिलउचलतात! सगळीकडे काही आलबेल सुरु आहे.

सज्जनहो! विचार करून ते अमलात आणण्याची क्षमता माणसाकडे आहे. केवळ पुरुष म्हणून नाही तर, "माणसाने माणसांविषयी विचार करून माणसांसोबत माणसाने माणसांसारखे वागावे!" हा अलिखित माणुसकीचा नियम आहे ना? मग खरंच आपण स्त्रीच्या बाबतीत काय आणि किती विचार करतो? हे महत्वाचे आहे की नाही? तिच्यावर निसर्गाने मातृत्व लादले आहे. ते किती कठीण आहे? याचा विचारच न केलेला बरा. केवळ सृजन म्हणून तिचा उदो उदो करून थांबता येईल का? एक तर नऊ महिने पोटात बाळ सांभाळायचे. गोळ्या इंजेक्शन्स? सगळं काही हसत हसत! त्यावर घरातील सर्व कामे. हे शक्तिशाली पुरुषांनो, दोन किलोचा दगड पोटावर बांधून एक दिवसभर फिरून बघा! झाडून काढा, उंडा चुरा, पोळ्या लाटा आणि एकदा फरशी पुसून पहाच! मग कळेल आपल्याला 'ती काय काय सहन करते ते?' मरणवेदना सहन करायच्या. लेबर पेन! शेवटी बाळंतपण! मरणकळा! त्यातही सर्व काही



व्यवस्थित झालं तर बाळ नाही तर अंत! किती भयंकर, जीवघेणं काम! जावे "ती"च्या वंशा तेंव्हा कळे! एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या माझ्या मुलीने काल मला अनेक गोष्टींचे ज्ञान दिले. हा जीवघेणा खेळ एवढ्यावरच थांबत नाही. त्यानंतर तिच्या शारीरिक मानसिक बाबतीत भयंकर बदल होतात. पोस्टपार्टम कॉम्प्लिकेशन्स, प्रसूती नंतरच्या समस्या! दवाखाने नव्हते तेंव्हा अनेक मातांना आपला जीव गमवावा लागला. त्या सर्व इथल्या अमानवी पुरुषसत्ताक पद्धतीच्या बळीच होत्या! प्रसुतीनंतर इन्फेक्शन होऊ शकते. हृदय, रक्तवाहिन्या संदर्भाने अडचणी निर्माण होऊन हृदयविकाराचा झटका येणे, अधिक रक्तस्त्राव, श्वास घ्यायला त्रास, असुरक्षितता, बाळ सुखरूप आहे का? याची भीती. मानसिक स्तरावर अनेक बदल होऊन ताणताणाव निर्माण होऊन तिला वेडेपणा, बरळणे, मनावरील ताबा सुटणे इत्यादी आणि असे बऱ्याच शारीरिक आणि मानसिक समस्या, आजार तिच्या जीवनात येऊ शकतात. हे किती पुरुषांना माहिती आहे? ठीक आहे. निसर्गाने दिलेल्या जबाबदारीला मान्य करू. त्यात पुरुषांचा दोष नाही हे ही मान्य, परंतु त्या कसोटीच्या काळात प्रत्येक पुरुषाने तिची काळजी घेणे हे तरी आपल्या हातात आहे ना? होय नक्कीच! याशिवाय घरातील अनेक कामे, जी पुरुषाला सहज करता येतात ती पण तिनेच करायची. का? पुरुषांना झाडून काढता येत नाही? अंगणात पाणी मारता येत नाही का? होय ही कामे पुरुषांनी करायलाच हवीत. यातही मोठी गंमत आहे! जर एखादा पुरुष घरातील ही कामे करत असेल तर समाजातील इतर स्त्रिया 'तो बायकांची कामे करतो' म्हणून आपसांत चर्चा करून त्या पुरुषांची टिंगल करतात! हे कितपत योग्य आहे? असो. अशी अनेक कामे आहेत जिथे एक पुरुष आपल्या घरातील आई, बहीण, वहिनी किंवा पत्नी इत्यादी स्त्रियांना त्यांच्या कामात मदत करू शकतो.

त्यासाठी आज आपण बदलण्याची नितांत गरज आहे! अलीकडे अनेक तरूण उपवर होऊन लग्नाची वाट पहात आहेत! मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाण बिघडले आहे. का? तर ते समाजाने स्त्रीभ्रूण हत्या करून स्वतःच बिघडवले आहे! वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची फळे समाज आज भोगत आहे. आज समाजाने स्त्रीकडे केवळ एक स्त्री, अबला, बिचारी, असहाय, परावलंबी इत्यादी भिंगातून पाहणे बंद करावे. ती तुमची आमची माता आहे. ती पत्नी असली तरी ती क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता आहे. जगप्रसिद्ध निबंधकार फ्रान्सिस बेकन म्हणतो, "स्त्री तारुण्यात पत्नी, मध्यम वयात मैत्रीण आणि म्हातारपणात परिचारिका (नर्स) असते!" आज पुरुषांनी तिचा आपल्या बरोबरीने विचार केला पाहिजे. ती स्वयंपाक करून आपल्याला गरमागरम खायला देते. ती शेवटी जेवते. कधीतरी आपण तिला गरम गरम खायला द्यायला काय हरकत आहे? स्त्री फार खंबीर, मजबूत आहे. अत्यंत कठीण प्रसंगात स्त्रीच पुरुषांना अनेक उपाय किंवा मार्ग सुचवते. तेंव्हा आपण तिला अबला समजू नये. ती कितीही कठीनातील कठीण कामे सहज करेल! त्यासाठी मात्र तिला गरज आहे ती भावनिक आधाराची! बिचारी ती फार हळवी आहे! आई आहे! चला तर मग भावांनो, एक आई, बहीण, वहिनी, पत्नी एवढेच काय एक स्त्री म्हणून आपण तिची जपणूक करूयात! माणसातील माणुसकी जपुया! ह्याच पृथ्वीवरील प्रत्येक स्त्रीला अनंत शुभेच्छा असतील!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# बाई पण भारी देवा..

आधुनिक केसरी

जिच्या उदरातून जन्म घेते दुनिया सारी, त्या विश्व शक्तीचे नाव आहे नारी. तीच आहे सृजनाची निर्मिती, तिच्यामुळे तेवतात दिव्यातील वाती, चहूकडे प्रकाश देऊनी जगतास ती उध्दारी, त्या विश्व शक्तीचे नाव आहे नारी. खरोखरच आई, ताई, पत्नी, मावशी, आत्या, मामी, बहीण अशा विविध भूमिका समर्थपणे सांभाळण्याचे काम स्रीया समर्थपणे करीत आहेत. असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीशी खंबीरपणे उभा असणारी स्त्री असते. ते अगदी खरेच आहे. बहुजनांना शिक्षण देण्यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची उभारणी केली. परंतु त्यासाठी त्यांच्या सौभाग्यवती लक्ष्मीबाई यांनी आपल्या माहेरहून आणलेल्या शंभर तोळे सोन्याचा त्याग केला. अगदी स्वत:चा सौभाग्य अलंकार म्हणजेच मंगळसूत्र त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी खर्ची घातले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बॅरिस्टर झाले. त्यांनी भारताचे संविधान लिहिले परंतु त्यावेळी घराची सर्व जबाबदारी सांभाळणाऱ्या त्याग माता रमाई होत्या हे विसरून चालणार नाही. ज्योतिबा फुले महात्मा झाले परंतु त्यांना सावित्रीबाईंची मिळालेली साथ विसरता येणार नाही. ज्यावेळी पत्नी पाठीशी खंबीरपणे असते. त्यावेळी संसारही सुरळीतपणे चालतो.



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

भारत देशाला महिलांचे असामान्य कर्तुत्व लाभलेले आहे.शिवबा पासून छत्रपती शिवाजी महाराज घडविण्याचा प्रवास म्हणजेच मासाहेब जिजाऊ होय. वडिलांच्या निधनानंतर निजामशाही वाचविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करणाऱ्या रजिया सुलताना होत्या. स्वराज्य जिंकून घेण्यासाठी महाराष्ट्रात आलेला औरंगजेब याच महाराष्ट्राच्या मातीत गाडणाऱ्या महाराणी ताराबाई यांचे कर्तुत्व जगमान्य आहे. गोंडवनची राणी दुर्गावती, राणी नूर जहान, झाशी वाचविण्यासाठी मुलाला पाठीशी बांधून लढणाऱ्या राणी लक्ष्मीबाई या महिलांनी पराक्रम गाजविला.

पूर्वी केवळ चूल आणि मूल एवढ्यावरच बहुजन समाजातील स्त्रियांचे भाव विश्व होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला होता. ब्रिटिश राजवटीत स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा होऊ लागली. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. विधवांचे पुनर्विवाह घडवून आणले. शिक्षणाची द्वारे खुली झाल्यामुळे महिलांच्या पंखांना बळ प्राप्त झाले. राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे सतीची प्रथा बंद झाली. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्येही अनेक स्त्रियांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. राणी लक्ष्मीबाई, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, प्रीतीलता वड्डेदार, सुचिता कृपलानी, कस्तुरबा गांधी यांसारख्या अनेक महिला स्वातंत्र्यसैनिकांच्या साथीमुळे भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी हिंदू कोड बिल मंजूर केले. त्याद्वारे स्त्रीला वडिलांच्या व पतीच्या संपत्तीमध्ये अधिकार प्राप्त झाला. स्त्रियांना हक्काची प्रसूती रजा प्राप्त झाली. 'समान काम,समान दाम'. असा कायदा मंजूर झाला. तरीही पुरातन विचारसरणीमुळे व सामाजिक व्यवस्थेमुळे महिलांना मिळालेल्या या संधीचा फायदा घेता आला नाही. इंदिरा गांधींच्या रूपाने स्त्रीला सन १९६६ साली देशाचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. किरण बेदी देशातील प्रथम महिला आयपीएस झाल्या. सुचिता कृपलानी, कमलजीत संधू,  बछेंद्री पाल, प्रतिभा पाटील,सिंधुताई सपकाळ यांनी पुरुषप्रधान विचारसरणी झुगारून देऊन आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर इतिहास घडविला. आज एकविसाव्या शतकात महिला कोणत्याही प्रकारे पुरुषांपेक्षा कमी नाहीत. घराच्या चार भिंतीमध्ये स्वतःचे आयुष्य बंद न करता त्यांनी आपले भाव विश्व विस्तारले आहे. कराटे, कुस्ती, जुदो यांसारख्या पुरुषी खेळ प्रकारांमध्ये स्त्रियांनी स्वतःचे सामर्थ्य दाखवून दिले आहे. आज स्त्रीया आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनलेल्या आहेत. असे असतानाही आजही पुरोगामी विचारांच्या भारतामध्ये स्त्रियांवर अत्याचार होण्याच्या घटना घडतात. हुंडाबळी सारखी घटना घडते की, ज्यामध्ये सासूच मुख्य गुन्हेगार असते.   प्रेमाची किंमत म्हणून याच स्त्रीच्या शरीराचे तुकडे-तुकडे केले जातात. त्याला लव जिहाद नाव देऊन स्वार्थी व्यवस्था आपली पोळी भाजून घेते. विनयभंग,बलात्कारासारख्या घटना घडतात. महिलांवरील अत्याचाराचे निराकरण करण्यासाठी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तरीसुद्धा माणुसकीला काळीमा फासणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटना घडतातच. केवळ स्त्री संरक्षणाचे कायदे करून भागणार नाही. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. परस्त्रीला मातेचा दर्जा देणारी छत्रपती शिवाजी महाराजांची विचारसरणी समाजमनावर बिंबविणे आवश्यक आहे. केवळ महिला दिनाच्याच दिवशी महिलांचे गोडवे गायले जातात. प्रत्येक दिवस हाच महिला दिन आहे;असे समजून महिलांचा सन्मान केला जावा. तेव्हाच खऱ्या अर्थाने बाईपण भारी देवा असे समस्त महिला भगिनींना वाटेल. जागतिक महिला दिनाच्या सर्व माता-भगिनींना हार्दिक शुभेच्छा.





# महिला दिन आणि महिला सक्षमीकरण

आधुनिक केसरी

प्रतिवर्षी जागतिक महिला दिन देशभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी नेतेमंडळींकडून स्त्री पुरुष समानतेच्या, महिलांच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी केल्या जातात, महिलांचा आदर करण्याचे सल्ले दिले जातात. महिलांच्या सन्मानार्थ शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांतून कर्तृत्ववान महिलांचा गौरव केला जातो, या दिवशी अनेक दुकानांमध्ये, ऑनलाईन शॉपिंग साईट्सवर महिलांसाठी विशेष सवलत दिली जाते.

या एक दिवशी महिलांना यथोचित सन्मान दिला जात असला तरी अन्य दिवसांतील महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो आजवर नेहमीच चढता राहिला आहे, दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अधःपतन ही  चिंतेची बाब आहे. त्यावर आज उपाययोजना काढली नाही, तर भविष्यात स्त्रियांना समाजात वावरणेही कठीण होऊ शकते. त्यासाठी सर्वप्रथम अश्लील संकेतस्थळाच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी आणणे आवश्यक आहे. वेब सिरीज, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृश्ये दाखवण्यास प्रतिबंध घातला पाहिजे. बलात्कार आणि  विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपींना अश्लील मालिकांतून आणि दृश्यपटांतून प्रेरणा मिळत असल्याचे निरीक्षण संबंधित गुन्हेगारांच्या सर्वेक्षणातून एका संस्थेने समोर आणले आहे. त्यामुळे या बाबीकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. शाळा महाविद्यालयांतून नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले जावे आणि या विषयाच्या वर्गामध्ये थोरा मोठ्यांच्या चरित्रांसोबत रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांसारख्या शूर आणि कर्तृत्ववान योध्यांची चरित्रे शिकवली गेली पाहिजेत. मुलींना शाळा महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ ज्युडो कराटेचे, लाठीकाठीचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक स्त्रीने स्वतःच घेतली पाहिजे. हेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण असेल.

सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

# जगाचा खेळ, धर्मांचा मेळ आणि शिवरात्री

आधुनिक केसरी

**मित्रांनो, शेक्सपियरने म्हटलेलं आहे की हे विश्व म्हणजे एक रंगमंच आहे आणि आपण सर्व ह्या रंगमंचावर अभिनय करणारे पात्र आहोत. मित्रांनो, ज्याप्रमाणे एखाद्या नाटकाची पटकथा पूर्व लिखित असते व त्याप्रमाणे दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली त्या नाटकातील सर्व पात्र आप-आपला अभिनय करत असतात. अगदी त्याच पद्धतीने ह्या विश्वरूपी नाटकांमध्ये आपण प्रत्येकजण देखील आप-आपला अभिनय करत आहोत. ज्या पद्धतीने एखादे नाटक प्रेक्षक म्हणून आपण पाहत असतो तेव्हा आपल्याला त्या नाटकामध्ये पुढे काय होणार आहे याची कल्पना नसते तसेच त्याची उत्सुकता देखील आपल्या मनाला लागून राहिलेली असते. जसजसे नाटक पुढे पुढे जात जाते तसतसे त्यामधील वेगवेगळ्या बाबींचा उलघडा होत राहतो व सरते शेवटी नाटकाचा शेवट होतो. थोड्याशा विश्रांतीनंतर नाटकातील सर्व अभिनेते अभिनेत्री पुन्हा त्याच नाटकाचा आणखी एक प्रयोग करण्यासाठी तयार होतात.**



राजयोगिनी
ब्रह्माकुमारी शिला

विश्वरूपी रंगमंचावर अविरत सुरु असलेल्या जगाच्या नाटकाचे, खेळाचे देखील असेच आहे. विश्वरूपी नाटकाची देखील पटकथा अनादी अविनाशी आहे. दिलेल्या पटकथेप्रमाणे ह्या विश्वातील प्रत्येक जण त्याचा त्याचा अभिनय करत आहे. ह्या विश्वरूपी नाटकाचा निश्चित असा असा कालावधी असतो. हे विश्वरूपी नाटक एकूण पाच युगांचे (अंकांचे) बनलेले आहे. सर्वप्रथम युग आहे सतयुग. सत युगामध्ये मनुष्य दैवी गुणसंपन्न, सोळाकला संपन्न आणि मर्यादा पुरुषोत्तम असतो. यामध्ये एकच आदी सनातन देवी देवता धर्म असतो. ह्या सतियुगामध्ये मानवा सोबतच सृष्टी देखील सतोप्रधान अवस्थेमध्ये असते. पाच तत्व देखील आपल्या संपूर्ण शुद्ध अवस्थेमध्ये असतात. सर्व प्रकारची मुबलकता सत्ययुगत असते. मानवाचा व्यवहार प्रेममय असतो. तसेच मानव जीवन सुख शांती आनंद इत्यादीने भरपूर आणि निर्विकारी असते. अशा या सतयुगाचे वर्णन करताना म्हटले जाते की सत युगातील भारतामध्ये सोन्याची चिडिया राहत होती तसेच येथून सोन्याचा धूर निघत असे आणि वाघा बरोबर शेळी देखील एकाच सरोवरामध्ये पाणी पीत असत. सत युगामध्ये प्रत्येकाचा अभिनय एकमेकाला पूरक व प्रेम सुख देणारा असतो. या सतियुगामध्ये विश्व महाराजा श्री नारायण व विश्व महाराणी श्री लक्ष्मी यांचे राज्य असते. कालांतराने सृष्टीचक्राच्या, अनादी खेळाच्या नियमानुसार विश्वरूपी नाटकाचा द्वितीय अंकाही, त्रेतायुगाची सुरुवात होते. त्रेता युगामध्ये मनुष्याचे जीवन सतयुगा प्रमाणेच सर्व प्रकारच्या वैभवाने संपन्न असते परंतु त्यामध्ये किंचितशी कमी आलेली असते. त्रेतायुगातील मानव हा 16 कला संपन्न च्या ऐवजी 14 कलासंपन्न बनतो. त्रेतायुगामध्ये श्रीराम व श्री सीतेचे राज्य असते. त्रेतायुग संपता-संपता मनुष्य आत्म्यामध्ये त्याने धारण केलेल्या देहाचे भान निर्माण होण्यास सुरुवात झालेली असते. मनुष्य आत्म्यामध्ये देहिक भान निर्माण झाल्यामुळे मानवाच्या जीवनामध्ये किंचितसे दुःख व अशांती निर्माण होण्यास सुरुवात होते. एकीकडे मानवाने वैभव संपन्न जीवन व्यतीत केलेले असते व अशातच त्याच्या अनुभवास येत असलेल्या दुःखाशांतीमुळे तो द्विधा मनस्थिती मध्ये असतो. अशाच वेळेला विश्वरूपी नाटकाचा तिसरा अंक अर्थात द्वापरयुग सुरू होते. द्वापर युगाच्या सुरुवातीला पाच तत्वांमध्ये देखील रजो प्रधानता आल्यामुळे बऱ्यापैकी उलथापालथ, जसे की भूकंप आदी होतात. सत्ययुग आणि त्रेतायुगातील मानवाचे निर्विकारी असलेले जीवन विकारी बनण्यास सुरुवात होते. या घटनेला बायबल मध्ये मनुष्याने त्यास परवानगी नसलेल्या वृक्षाची फळे खाल्ली असे म्हटले गेलेले आहे. विकारी जीवनाची सुरुवात झाल्यामुळे, अनुभवास येत असलेल्या दुःख अशांती पासून मुक्तता प्राप्त करण्यासाठी मनुष्य भक्ती



करण्यास आणि आरंभ करतो. द्वापर युगामध्ये प्रामुख्याने, कल्याणकारी शिव परमात्म्याचे प्रतीक असलेल्या शिवलिंगाची स्थापना करून शिवाची अव्याभीचारी भक्ती केली जाते. याच द्वापरयुगामध्ये वेगवेगळे धर्म संस्थापक सृष्टीवर येऊन आपापले धर्म स्थापन करतात. वास्तविक पाहता सर्व धर्म संस्थापकांचा त्यांचे त्यांचे धर्म स्थापन करण्याचा उद्देश मनुष्य जीवनामध्ये शांतता प्रस्थापित करणे, प्रेम वृद्धिंगत करणे हाच असतो तरीदेखील वाढत्या देहभानामुळे मानव काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार इत्यादी विकारांच्या अधीन होत जातो व मानवी जीवन आणखीनच दुखी कष्टी बनत जाते. आप-आपसामधील द्वेष-वैर, हिंसाचार वाढत जातो. परंतु मनुष्यास सुख शांती प्राप्त करण्याचा सत्य मार्ग माहित नसल्यामुळे तो आहे त्या मार्गावर चालत राहतो आणि हळूहळू विश्वरूपी नाटकाचा तृतीय अंक अर्थात द्वापरयुग देखील संपुष्टात येते. द्वापर युगांतर विश्वरूपी नाटकाचा चौथा अंक अर्थात कलियुगाचा आरंभ होतो. कलियुगामध्ये मुख्य धर्मासोबतच अनेक छोटे-छोटे मठ-पंथ स्थापन होऊ लागतात आप-आपसामधील गटबाजी, देहीक अहंकार वाढत जातो, परिणाम स्वरूप मानवी जीवन आणखीनच दुःखी-कष्टी बनत राहते. कलियुगाच्या शेवटी शेवटी जीवनामधील दुःख-अशांती पराकोटीला पोहोचते. शास्त्रांमधून याचेच वर्णन नर्क असे आलेले आहे. सध्याच्या काळामध्ये मनुष्य नरक यातना अनुभवत आहे. सध्याचे मानवी जीवन अनेक धर्म, अनेक भाषा,अनेक प्रांत, अनेक जाती, अनेक वंश, अनेक भेद, श्रीमंत- गरीब, उच्च-नीच, अशा एक न अनेक गोष्टींनी भरकटून गेलेले आहे. सगळी कडे अधर्म फोफावलेला आहे. सतयुग आणि त्रेता युगामध्ये अर्थात स्वर्गामध्ये अनुभवास येणाऱ्या प्रेम, सुख, शांती, आनंद, पवित्रता, वैभव संपन्न जीवनाची जागा कलियुगामध्ये दुःख-अशांती, वेगवेगळे कलह-क्लेश-रोग इत्यादींनी घेतली जाते.

ह्या अनादी खेळाच्या नियमानुसार, विश्वरूपी नाटकांमध्ये कलियुगानंतर पुन्हा सतयुगाचा अंक सादर होणार आहे. तेव्हा कलियुगातील सर्व मनुष्य आत्म्यांना सतयुगाच्या अंकामध्ये जाण्यायोग्य अर्थात, कवडीतुल्य मानवास हिरेतुल्य देवता बनवण्याच्या उद्देशाने देवाधिदेव महादेव अर्थात सर्व आत्म्यांचे कल्याणकारी शिव परमात्मा कलियुगाचा अंत व सत युगाचा प्रारंभ याच्या संधिकालामध्ये अर्थात, वर्तमान वेळेस प्रवेश करतात. परमात्मा शिव यांना स्वतःचे शरीर नसल्याकारणाने ते एका साधारण मनुष्याच्या शरीरात परकाया प्रवेश करतात. परकाया प्रवेशानंतर ते सर्वांना स्वतःचे, व सृष्टीचक्राचे ज्ञान देतात ज्याच्या आधारे मनुष्य स्वतःला दैवी गुणसंपन्न बनवून सतयुगात जाण्यालायक बनवातो. शिव परमात्मा ज्या युगामध्ये या सृष्टीवर अवतरीत होतात त्यास परमात्मा मिलनाचे युग अर्थात संगमयुग असे म्हणतात. सध्या संगमयुग सुरू असून लाखो करोडो मनुष्य परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करून, ते स्वतःमध्ये धारण करून देवी गुणसंपन्न बनत आहेत. परमात्मा शिव या धर्तीवर अवतरीत झाल्यानंतर ते अनेक धर्मांचा विनाश तसेच अधर्मांचा विनाश करून एका सत्य धर्माची स्थापना करतात ज्याला आदि-सनातन देवी-देवता धर्म असे म्हणतात. धरतीवर झालेल्या परमात्मा शिव यांच्या या अवतरणाच्या स्मृती प्रित्यर्थ सगळीकडे शिवरात्री साजरी केली जाते कारण कल्याणकारी शिव परमात्मा सर्व मनुष्यत्म्यांना अज्ञानाच्या अंधकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातात.

शिव परमात्मा म्हणजे नेमकं कोण?, प्रजापिता ब्रह्मा कोणास म्हणतात? श्रीकृष्ण श्री राधा तसेच विश्व महाराजा व विश्व महाराणी श्री लक्ष्मी आणि श्री नारायण, श्रीराम व श्री सीता यांच्याबरोबरच तेहतीस कोटी देवतांचे काय रहस्य आहे?, महाभारत केव्हा, कुठे व कसे घडले, महाभारतामध्ये वर्णित विविध घटनांचा सध्याच्या काळाशी काय संबंध आहे? भारताचा सुप्रसिद्ध असलेला प्राचीन राजयोग काय आहे? शाश्वत सुख व शांती प्राप्त करण्याचा मार्ग कोणता आहे? विश्वरूपी नाटकाचा कालावधी किती? यासारख्या सर्व प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सेवा केंद्रामध्ये आपले स्वागत आहे. सर्व शिवभक्तांना शिवरात्रीच्या हार्दिक शुभेच्या.

# 'ॐ नम: शिवाय' मनात असू द्या... कपड्यावर नको !

आधुनिक केसरी

**हल्ली 'ॐ नम : शिवाय ।' हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. महाशिवरात्रीनिमित्त प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नम : शिवाय ।' मंत्रजप छापलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते.**



जगन घाणेकर
मो. ९६६४५५९७८०

अंगभर ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नमः शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नमः शिवाय सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का ? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का ? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे !




# भगवान शिव यांचा अगाध महिमा

आधुनिक केसरी

**विश्वनाथ असताना देखिल कैलास पर्वतावर स्वत :साठी ना महल न वैभव सदैव ध्यानस्थ राहुन राम नामाचा जप करत स्थित प्रज्ञ भाव ठेवत त्रिलोक्याच्या कल्याणाची कामना करणारे भगवान शिव यांचा महिमा एवढा अगाध आहे कि अशक्याला शक्य करण्याची त्या सोबतच विषसमतेला समतेत व प्रतिकुलतेला अनुकुलतेत परिवर्तित करण्याची ताकद फक्त भगवान शिव शंकर यांच्या मध्ये आहे .आपल्या धर्मतील शास्त्रानुसार व संस्कृती नुसार अनन्यसाधारण असं महत्व असणारे व सृष्टीचे निर्माते संहारक, जगदपालक भगवान शिव शंकर यांचा महिमा किती वर्णन करावा तो किती हि वर्णन केला तरी वेदांची मती देखिल कुंठीत होईल आपण तर मानव आहेत.**



गणेश खाडे
मो. 9011634301

सर्व धार्मिक ग्रंथ सर्व वेद पुराण सुद्धा थक्क होतील एवढं प्रचंड महात्म्य भगवान शिव शंकर यांचे आहे. हिंदू धर्म शास्त्रानुसार भगवान शंकर यांची पुजा हि गुरू म्हणून केली जाते ज्यांना आपण शिव म्हणून संबोधतो. शिव म्हणजे सर्व गुण संपन्न भगवान शिव शंकर हे सृष्टी वर अनेक रूपाने परिचित असले तरी अंनत असे गुण हि त्यांची ओळख आहे.आशुतोष सर्व इच्छा त्वरीत पूर्ण करण्याची क्षमता असणारे,आदिगुरू प्रथम गुरू,आदिनाथ सर्वोच्च स्वामी,अदियोगी प्रथम योगी,अज अजन्मा,अक्षयगुण, अगणित सदगुण असणारे,अनघ निष्कलंक,अनंत दृष्टी अमर्याद दृष्टीचा महामेरू,औघद जो निरंतर मौजमजेत दंग आहे.अव्ययप्रभु अविनाशी,भैरव भीतीचा नाश करणारा ,भालनेत्र कपाळावर नेत्र असलेले भोलेनाथ म्हणजे साधाभोळा, पंचमहाभूतांवर प्रभुत्व असणारा ,भुदेव पृथ्वी चा देव ,भूतपाल शरिरारहित जीवांचा रक्षक,चंद्रपाल चंद्राचा स्वामी म्हणजे,चंद्र प्रकाश ज्यांच्या माथ्यावर चंद्र आहे.दयाळु,देवाधिदेव देवांचा देव,धनदिप संपत्तीचा देव,ज्ञानदीप ध्यानाचा प्रकाश,द्युतीधारा तेजाचा परमेश्वर,दिंगबर ज्याने आकाश अंग वस्त्र म्हणून धारण केले,दुर्जनीय ज्ञात करणे कठिण आहेत असा, दुर्जय म्हणजे अजेय ,गिरजापती पार्वती चा स्वामी,गुणग्रही गुण ग्राहक, गुरूदेव महान गुरू ,हर पापे दूर करणारा , जगदिश,विश्वाचा स्वामी ,जराधीशामन दुःखा पासुन मुक्ती देणारा, कैलासनाथ ,कमलाक्षन कमल नयनी भगवान,कंठ सदैव तेजस्वी,ललाटक्ष तिसरा नेत्र असणारे, लिंगाधयक्ष लिंगाचा स्वामी, भुतेशवर, लोकांकर तीन लोकांचे निर्माते, लोकपाल, जगाची काळजी घेणारे, महा बुद्धी अतिशय बुद्धिमान, महादेव महान असे देव, महाकाल काळाचा स्वामी, महामृत्युंजय मृत्यू वर विजय प्राप्त करणारे महाशक्ती मय ज्यांच्या कडे अमर्याद अशी उर्जा आहे. महायोगी महान योगी महेश सर्वोच्च देव, महेश्वर देवांचा देव, नित्य सुंदर सदैव सुंदर, ओंकार, पशुपती सर्व प्राणीमात्राचा स्वामी, रूद्र गर्जना करणारा, सदाशिव, शंभो स्कंदगुरू म्हणजे वेदांचा प्रकाशक, सोमेश्वर म्हणजे शरिर सुद्ध असणारा स्वंयभु स्वनिर्मित, त्रिपुरारी असुरानी निर्माण केलेले तीनही लोक विनाशक, वरद वर देणारा, वीरभद्र पाताळाचा सर्वोच्च देव, शुभ, भगवान शंकर एवढ्या बलाढ्य उपाधी धारण करणारे आपल्या सगळ्यांचे ईश्वर भगवान शिव असुन सृष्टीच्या कल्याणासाठी जेव्हा देव आणि दैत्य यांनी एकत्र येऊन समुद्र मंथन करण्याचा निर्णय केला.यावेळी समुद्र मंथनातून अनेक अनमोल रत्न अमृत बाहेर आले आणि त्या सोबत प्रचंड प्रमाणात विष देखील बाहेर निघाल.सदर विषाने संपुर्ण सृष्टी नष्ट होईल अशी अवस्था निर्माण झाली नेमकं याच वेळी समुद्र मंथनातून निघालेल विष हे कोणीही स्वीकारण्यासाठी तयार नव्हतं पण सृष्टी वरील जीव सृष्टी वाचविण्यासाठी भगवान शंकर यांनी मात्र पुढे होऊन हे विष प्राशन करून आपल्या कंठात साठवलं म्हणून शिव हे निलकंठ,आहेत.आणि याच रात्री शिव यांना जागृत ठेवण्यासाठी महाशिवरात्री पर्व साजर झालं.ज्यांच्या जटात साक्षात जगद उद्धारक गंगा विराजमान आहे.शितलतेच प्रतिक असणारे चंद्रमा डोक्यावर विराजमान आहेत.भक्तांच्या हाकेला धावून येणारे आणि कोणाताही विचार न करता क्षणात प्रसन्न होऊन वांछित वरदान देऊन भक्तांची इच्छा पुर्ण करणारे ज्यांना भोलेबाबा.हे प्रतिकुलतेला अनुकुलतेत परिवर्तित करण्याची क्षमता ठेवून आहेत तसंच विषमतेत समतेच साम्राज्य निर्माण करण्याची ताकद या त्रिलोकात जर कोणा कडे असेल तर हि ताकद क्षमात देवांचे देव कैलाशपती महादेव यांच्या मध्ये आहे .सृष्टीच्या रचनेसह



संहराची जबाबदारी त्यांनी आपल्या खांद्यावर पेलली आहे हिंदू धर्म शास्त्रानुसार आणि संस्कृती नुसार देवांचे देव कैलाशपती महादेव यांची शक्ति महती आणि महात्म्य अपरंपार आहे.अतुलनीय आहे.आणि विशेष म्हणजे सृष्टी वर जितके अंमगल आहेत ते सर्व भगवान शिव यांचे लाडके भक्त आहेत.आणि भगवान शिव यांना विषाचा त्रास होऊ नये म्हणून सृष्टी वरील सर्व देव देवतांनी साजरा केलेला महा उत्सव ज्ञानाचा जागर अंखड जागर म्हणजे महाशिवरात्री पर्व असून सगळे अवगुण भगवान भगवान शिव यांच्या चरणी अर्पित करून भगवान शिव यांच्या कडून ध्यान स्वीकारलं पाहिजे.

**लेखक हे विचारवंत साहित्यिक आध्यत्मिक मार्गदर्शक तथा वंजारी महासंघ संस्थापक आहेत.**

# !! शिव महात्म्य !!

आधुनिक केसरी

आज महाशिवरात्र ...केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये प्रत्येक शिवमंदिरामध्ये हजारोच्या संख्येने भक्तगण येतात.. आपल्या परमप्रिय शिवाचे दर्शन घेण्यासाठी हातां मध्ये फुलमाला घेऊन तासंतास रांगेतउभारतात.. अंत :करणापासून आपल्या शिवाचे दर्शन व्हावं ही ओढ त्याच्या मनात असते..हळूहळू रांग पुढे सरकते..मग ते भक्तगण शिव मंदिराच्या गाभाऱ्यात येतात.. आपल्या परमप्रिय शिवलिंगाचे दर्शन होतं.. आपलं जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटते.. त्या भक्तगणांचे अंतकरण भरून जातं ..अशा या शिवाच्या महाशिवरात्रीच्या दिवशी आपल्या परमप्रिय देवतेचं म्हणजेच ".शिव महात्म्य" कसं आहे...हे समजावं ..म्हणून हा अभ्यासपूर्ण लेख आपल्या भक्तगणांसाठी...भारतीय सण.. संस्कृती..मंदिराचे अभ्यासक सुधीर कोर्टीकर यांनी खास लिहिलेला प्रसिद्ध करण्यात येत आहे...



सुधीर कोर्टीकर
मो.नं.९७६५५५३३१२

श्री शंकराने सृष्टीचा आरंभ हा निर्गुण निर्विकार परमात्म्यापासून सुरू केला. त्यालाच वेद वेदांच्या जाणकारांनी शिव असे संबोधलेले आहे . या शिवा पासूनच पुरुषासहित प्रकृतीची निर्मिती झाली. त्यानंतर दोघांनी स्थिर राहून पाण्यात तप केले. तिलाच पंचक्रोशी असे संबोधतात... तीच काशी होय.. विष्णू आपल्या मायेसहित त्या काशीच्या पवित्र जलावर पहुडले. त्यामुळे त्यांना हरी नारायण नावाने सर्वत्र संबोधले जाऊ लागले. तसेच प्रकृती नारायणी या नावाने प्रसिद्ध झाली. हरिनारायणाच्या नाभीतून उत्पन्न झालेल्या कमलापासून निर्माण झाले ते ब्रह्मदेव. पुढे ब्रह्मदेवांना आपल्या तापाच्या बळावर विष्णूच दर्शन घेतलं. पुढे ब्रह्मदेव आणि विष्णू यांच्यामध्ये विवाद झाले. असे विवाद शांत करण्यासाठी निर्गुण स्वरूपाचे शिवानी प्रदर्शन केले. त्यामधूनच ते पुढे महादेव या नावाने प्रसिद्ध झाल्याचा उल्लेख शिवपूर्णातील कोटी रुद्र संहिता या खंडात आढळतो. त्याप्रमाणे शिव म्हणजे मी शंभू विधात्याच्या मस्तकापासून प्रगट होऊन पुढे ते रुद्र या नावाने प्रसिद्ध झाले.

शंकराने विष्णूंना सर्व वेदांचा उपदेश केला. शंकरांनी आपल्या ओघवत्या वाणीतून संपन्नतेतून आपल्या मंत्र घोषणातून ध्यान धारणेतून विष्णुना यथासांग पूजा सांगितली. शंकर देवता ही सर्व विद्यांची स्वामी आहे. ही देवता वेदांची निर्मिती करणारी आहे. वेळेस प्रमाण असते परंतु या काळाला मात्र प्रमाण नाही. शिवाची स्वतः महाकालीने सेवा केली.ते साक्षात महाकाल आहेत. शिव स्वतः कारक आणि कार्य स्वरूप आहेत. त्यांना कोणीही कारण होत नाही. शिव एक असूनही अनेक रूपे धारण करू शकतात. त्याप्रमाणे ते अनेक स्वरूपात असूनही एक रूपात राहतात. ज्याप्रमाणे एक बीज फळाच्या बाहेर एका बिजाच्या स्वरूपात आहे पण त्या बीजापासून एका वृक्षाची निर्मिती होईल त्या वृक्षास हजारो फळे येऊन त्या फळापासून अगणित बीजांची निर्मिती होईल म्हणजे ते एक बीज अनेक बिजांच्या निर्मितीचा स्त्रोत असून ते एकच आहे. भक्तीभावांनो शिवाचे पूजा.. अर्चा ..पूजन.. नामस्मरण केल्यावर एक आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होते. याच ज्ञानातून उत्तम संस्कार प्राप्त होतात. या संस्कारातून मनातील अहंकार दूर होऊन अंतर्मनास एक शुद्धतेचे स्वरूप प्राप्त होते. शिवाची त्यासाठीच अंतकरणापासून भक्ती करा याच भक्ती पासून प्रेम मिळेल. प्रेमाने श्रवण केल्या चांगल्या सत्संगाची निर्मिती होईल. चांगल्या सत्संगामधूनच चांगल्या विद्वान गुरूंची



प्राप्ती ना होईल. या साऱ्याच विद्वाननं गुरुच्या पासून मोक्षप्राप्तीपर्यंतचे ज्ञान मिळू शकते या ज्ञानाच्या माध्यमातून तो भक्त मुक्ती प्राप्त करू शकतो. शंकराची मनोभावे पूजन करून भक्तीच्या मार्गाने तो परमोच्य मोक्ष प्राप्तीपर्यंत पोहोचू शकतो. मात्र त्यासाठी तितकी आध्यात्मिक श्रद्धा भक्ती हृदयात असावयास हवी. परमोच्च अशा मुक्तीची प्राप्तता करण्यासाठीचे ज्ञान शंकराने विष्णू देवांना दिले. विष्णू देवाने हे ज्ञान ब्रह्मदेवाने कथा द्वारे दिले. ब्रह्मदेवांनी सनकादिक ऋषींना सांगितले. सनकादिक ऋषींनी हे ज्ञान नारदमुनींना दिले.नारमुनींनी हे ज्ञान व्यासांना दिले. व्यासाने हे ज्ञान अलौकिक ठेवा जगाच्या हितासाठी जतन करून ठेवला. त्यानंतर व्यास ऋषींनी हे ज्ञान अनेक पुराणे.. अनेक शास्त्र.. अनेक वेद.. याचे मनात सतत चिंतन करून स्मरण करून हजारो भक्तगणांना हा संस्काराच्या माध्यमातून ज्ञानाचा ठेवा दिला.

शिवभक्ती मुळे भुक्ति मिळते. अशा भुक्ति मधूनच मुक्ती प्राप्त होते. शिव म्हणजे सतत चांगले कर्म करा. हे चांगले कर्म करणे म्हणजेच एक भक्ती केल्यासारखे आहे. या चांगल्या कर्मा मधूनच परमभक्तीची निर्मिती होते. या भक्ती मधूनच चांगले ज्ञान मिळते. चांगल्या संपन्न ज्ञानाच्या जोरावर मुक्ती प्राप्त होत होऊ शकते. कर्मयोग हे मुक्ती प्राप्त करून देणारे एक साधन आहे. एक चांगला मार्ग आहे क्रियायोग हा योगाचे परम साधन आहे. वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील अक्षय तृतीयेला शंकरासह देवीचे षोडशोपचारे यथासांग पूजन करावे. त्यामधून त्याला धर्म , अर्थ , काम , मोक्ष अशा चार पुरुषार्थाची प्राप्ती होते. असा उल्लेख शिवपूर्णातील उमासंहितेच्या खंडामध्ये आपणास आढळतो. परिशुद्ध आत्मा असल्यामुळे महादेवाला शिव म्हणतात. महेश्वर म्हणजे 23 तत्त्वापासून दूर असलेली प्रकृतिआहे. जो प्रकृति तिच्या भोगासही लीन असतो. त्या लीन होणाऱ्या पुरुषांपेक्षाही तो खूप वेगळा आहे. खूप दूर आहे. असा तो महेश्वर जो सर्व गुणांनी युक्त असून तो सर्वांच्या आत्म्याच्या पेक्षा वेगळा आहे. तो परमात्म्या पेक्षाही वेगळा आहे. तो स्वयं शिव परमात्मा आहे. तो सर्वांग सुंदर असा महेश्वर आहे. भक्ती मधूनच मुक्तीचे द्वारे उघडतात. शिव कृपेनेच मानवी मनात भक्तीच्या उदयाने प्रसन्नता प्राप्त होते. या भक्ती भावातूनच ज्ञानसंपन्नता होते ज्ञानसंपन्नतून आत्मशक्ती प्राप्त होते. सरते शेवटी ही ज्ञानसंपन्नता , आत्मिक शक्ती , अपार शिवभक्ती, त्या शीव तेजातच विलीन होणारी आहे .शिवभक्तांनी त्याची यथासांग पूजा करण्यासाठी स्नान करावे शिवलिंगाचे पूजन करावे .सर्वसंग त्याग करून अष्टमी , चतुर्थी ,पौर्णिमा , विशेष करून एकादशीला शंकराच्या शिवलिंगाचे पूजन करावे. चित्ताची एकाग्रता करून मनोभावे शिवपूजन केले तर त्यास नवीन आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होऊन त्याच्या जीवनाचे सुख शांतीने समाधान मिळू शकते हेच खरे.

शिवाची बारा ज्योतिर्लिंग ही शंकराच्या भक्तीची प्रतीके आहेत. ती पवित्र ज्ञानमंदिरे आहेत. ज्योतिर्लिंग म्हणजे ब्रह्मलिंग होय .विश्वाच्या शक्तीचे प्रतीक म्हणून शिवलिंगाचे पूजन केले जाते. शिवाची पूजा लिंगाच्या स्वरूपात करण्याची ऋढी ही पूर्वापार चालत आलेली आहे. आर्य समाजात ..द्रविड समाजातही.. शिवलिंगाचे पूजन केल्याचा उल्लेख आहे. शिवपूराणात.. उपनिषदा मधूनही याचा उल्लेख आहे. साऱ्या विश्वाची निर्मिती ही बारा मूल तत्वामधून झालेली आहे. पृथ्वी, आकाश, तेज, आप, वायु, बुद्धी, मन, अहंकार, चित्त , जीव, प्रकृती , पुरुष , अशा या 12 मूलतत्त्वाची ही प्रतिकात्मक रूपे म्हणजेच ही बारा ज्योतिर्लिंगे आहेत .बारा ज्योतिर्लिंग पैकी आपल्या महाराष्ट्रात पाच आहेत. ही शिवदेवतेची प्रतिक म्हणजेच ही सुंदर मंदिर आहे. मंदिरांपैकी पाच मंदिरे महाराष्ट्रात असल्यामुळे शिवाचा वरदहस्य या मंदिरांच्या रूपाच्या माध्यमातून आपल्या शिवभक्तांना लाभलेला आहे असंच म्हणावं लागेल...

## पीरबावडा येथून बकऱ्या लांबवल्या

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील पिरबावडा शिवारातील एका शेतातून ४५ बकर्या अज्ञात चोरट्यांनी लांबवल्या. याप्रकरणी वडोदबाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अब्दुल रहेमान अलि बाजामान (५५) यांची पिरबावडा शिवारात गट नं. २५२ मध्ये तीन एकर शेती आहे. शेतीला जोड व्यवसाय म्हणून त्यांनी मागील ४ वर्षांपासून शेतातच शेळी पालन व्यवसाय करीत आहे. मंगळवारी रात्री त्यांनी सर्व लहान मोठ्या शेळ्या, बोकड गोठ्यात कोंडून रात्री दहाच्या सुमारास पिकास पाणी भरण्यासाठी गेले होते. यादरम्यान अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात कोणी नसल्याची संधी साधून गोठ्यातील ३५ शेळ्या व १० बोकड अज्ञात वाहनात कोंबून पोबारा केला. बुधवारी पहाटे फिर्यादी गोठ्यावर आले तेंव्हा गोठ्यातील काही शेळ्या व बोकड गायब असल्याचे दिसून आले. त्यांनी परिसरात शोध घेतला असता मिळून आल्या नाही. त्यामुळे बकर्या चोरी झाल्याची त्यांना खात्री झाली. चोरट्यांनी येथून १ लाख ७५ हजाराच्या ३५ बकर्या व ५0 हजाराचे 10 बोकड असे एकुण 45 शेळ्या व बोकड लांबवले. या प्रकरणी वडोदबाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक सुनील इंगळे, उपनिरीक्षक गजानन कोळासे करीत आहे.

## बांधकाम कामगारांनो एकीची वज्रमूठ बांधा : डॉ. करणसिंह घुले

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या समर्पण फाऊंडेशन संचलित समर्पण मजदूर संघाच्या वतीने आयोजित बांधकाम कामगारांच्या मेळाव्यास बुधवारी नेवासा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आपल्या न्याय हक्कांसाठी व शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी समर्पण मजदूर संघ आपल्या पाठीशी सदैव तत्पर असून बांधकाम कामगारांनो त्यासाठी आपल्या एकीची वज्रमुठ बांधा असे आवाहन समर्पण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी बोलताना केले. नेवासा नगरपंचायतच्या प्रांगणात बुधवारी सायंकाळी झालेल्या बांधकाम कामगारांच्या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन गायकवाड हे होते तर अँड. बन्सीभाऊ सातपूते, इंजिनियर सुनीलराव वाघ,नगरपंचायतचे प्रशासकीय अधिकारी रामदास म्हस्के, इंजिनियर अनिल खंडागळे, इंजिनियर संपतराव बुळे, इंजिनियर आनंद सोलट, इंजिनियर दत्तात्रय वाबळे, समर्पण मजदूर संघाचे अध्यक्ष राजेंद्र थोरात, ठेकेदार राजेंद्र परदेशी, मनसेचे कामगार दीपक परदेशी, डेव्हिड साळवे, मच्छिंद्र गव्हाणे, अनिल सोनवणे, बबनराव राजे,ज्ञानदीप देशमुख, शामभाऊ ढोकणे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी झालेल्या मेळाव्याच्या प्रारंभी भगवान विश्वकर्मा व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी उपस्थित मान्यवरांचे समर्पण मजदूर संघाचे अध्यक्ष राजेंद्र थोरात यांनी स्वागत केले. समर्पण फाऊंडेशनचे प्रवक्ते पत्रकार सुधीर चव्हाण यांनी समर्पण फाऊंडेशनचे सामाजिक योगदान व बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात आलेले उपक्रम आपल्या मनोगताद्वारे विषद केले.



कामगार नेते कृष्णा डहाळे यांनी मेळाव्यात बांधकाम कामगारांच्या हिताच्या दृष्टीने तयार करण्यात आलेले ठराव वाचून दाखवले व पाठपुरावा करण्यासाठी सदरचा ठराव डॉ.घुले यांच्याकडे सुपूर्त केले. यावेळी बांधकाम कामगारांना मार्गदर्शन करतांना समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले आतापर्यंत आम्ही नोंदीत कामगारांना व असंघटित कामगारांना संघटित केले शासनाच्या योजना प्राप्त करून घेतांना अनेक पाठपुरावे करावे लागतात त्यासाठी संघर्ष ही करावा लागतो त्यासाठी आम्ही आपल्या पाठीशी आहोत एकीची बळ जर असेल तर अनेक संकटे पार करून आपल्याला न्याय देण्यासाठी आपल्या पाल्यांना शैक्षणिक लाभ देण्यासाठी पाठीशी राहू अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली काही बोगस नोंदी आढळून आल्या आहे काही नाजूक हात ही योजनांचा लाभ घेतांना दिसत आहे त्यावर ही कारवाई केली जाईल आपल्या हाताला घट्टे पडलेल्या कामगारांना हे दाखवून द्यायचे आहे असे सांगून त्यांनी आम्ही आपल्या पाठीशी आहोत आपल्या न्याय हक्कासाठी संघटित व्हा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. इंजिनियर अनिल खंडागळे, ज्ञानदीप देशमुख, दीपक परदेशी यांनी मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी नोंदीत कामगारांना भांड्यांचे संच तर नैसर्गिक मृत्यू झालेल्या कुटुंबियांच्या नातेवाईकांना दोन लाखाचा धनादेश, मुलींच्या विवाहासाठी ५१ हजाराची मदत धनादेशाच्या रूपाने प्रदान करण्यात आली.समर्पण फाऊंडेशनचे प्रवक्ते पत्रकार सुधीर चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर बांधकाम कामगार पोपट शेकडे यांनी उपस्थित कामगारांचे व मान्यवरांचे आभार मानले.

## राजमाता विद्यालयात कार्यशाळा संपन्न; चार्टर्ड अकाऊंटन्सी या कोर्सबाबत मिळाले मार्गदर्शन



आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** "वन डे वर्कशॉप ऑन करीअर गाईडन्स" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांडेवाडी, भोसरी आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटस ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्गत आयोजित करण्यात आली होती. या क्षेत्रातील तज्ञ असलेल्या सीएंकडून विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील ज्ञान जाणून घेत असताना ही एक दिवसीय कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार विलास लांडे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.जी.कानडे,उपप्राचार्य प्रा.किरण चौधरी, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण भोसले सीए निखिल कुलकर्णी आणि सीए सचिन ढेरंगे आदी उपस्थित होते.सदर कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.जी. कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेतून सीए निखिल कुलकर्णी आणि सीए सचिन ढेरंगे यांनी विद्यार्थ्यांसोबत महत्वपूर्ण संवाद साधला.सीए सचिन डेरंगे यांनी स्वतःच्या जीवनातले अनुभव व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले तर सीए निखिल कुलकर्णी यांनी चार्टर्ड अकाऊंटन्सी या कोर्सबाबत सखोल माहिती दिली आणि चार्टर्ड अकाउंट हा वेगवेगळ्या क्षेत्रात जसे कि वित्त,लेखा परीक्षण, करआकरणी आणि विविध कायदेविषयक सल्ले या क्षेत्रात वर्चस्व गाजवतात.असे त्यांनी सांगितले.कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ.सुग्रीव आडाल तर आभार प्रदर्शन विभागप्रमुख प्रा.जयश्री अरमानी यांनी केले.कार्यशाळेच्या आयोजनामध्ये प्रा. सुनील दांडेकर, प्रा.सुनिता पांचारिया, प्रा.सपना बिराजदार प्रा.प्रियांका शिंदे व प्रा.तेजस्विनी गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# छत्रपती संभाजी महाराजांवरील टपाल तिकीटाचे अनावरण

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्मिळ पत्रांचेही होणार प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्या दि. ०७ मार्च (गुरुवार) छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाचे अनावरण झाले. चंद्रपूरमधील प्रियदर्शनी सभागृहात सकाळी ११.०० वाजता हा कार्यक्रम झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष राज्य सरकारच्या वतीने साजरे केले जात आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून गेल्या वर्षभरापासून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून गुरुवारी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. याचवेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्मिळ पत्रांचेही अनावरण झाले. याशिवाय मराठेकालीन टाकसाळी संबंधीची मोडी कागदपत्रे खंड-१, ब्रेल लिपीमध्ये मुद्रित छत्रपती शिवाजी महाराज, 'महाराष्ट्र - गोंड समुदाय'



हे महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर यांचेही प्रकाशन या सोहळ्यामध्ये झाले. मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने आतापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज, शहाजीराजे भोसले, माँ जिजाऊ यांच्यावर आधारित टपाल तिकिटाचे प्रकाशन झालेले आहे. याशिवाय मुनगंटीवार यांनी अधिवेशनात औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर होण्यासाठी तत्कालीन सरकारसमोर मागणी लावून त्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. आता छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाच्या माध्यमातून एक महत्त्वाकांक्षी कार्य पूर्णत्वास येणार असल्याची भावना मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

**आणि दांडपट्टा 'राज्यशस्त्र' झाले :** छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या श्रीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले. 19 फेब्रुवारी 2024 ला पोंभुर्णा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण श्री. मुनगंटीवार यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचा 'दांडपट्टा' राज्यशस्त्र म्हणून अलीकडेच घोषित केला. याशिवाय रायगडावर शिवराज्याभिषेक मिरवणूक सोहळ्यासाठी चांदीची पालखी रायगड उत्सव समितीस भेट देणे, मुंबई येथे पुरातत्त्व विभागामार्फत आयोजित शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, विशेष लोगोचे प्रसारण करून शासकीय कामकाजात त्याचा वापर आदी कल्पक कामे सुधीर मुनगंटीवार पुढाकाराने करण्यात आली.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेल्या अनेक ऐतिहासिक निर्णयांमुळे ऐतिसाहिक वारसा आणि परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करताना सांस्कृतिक कार्यक्रमांसह ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी पुढाकार घेतला. २९ जुलै १९५३ नंतर पहिल्यांदा प्रतापगड येथील अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण सरकारने हटवले. ५ नोव्हेंबर २०२२ ला हे अतिक्रमण हटविण्यात आले. आग्रा येथील किल्ल्यामध्ये १९ फेब्रुवारी २०२३ ला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अतिशय दिमाखात साजरी करण्यात आली. २ जून २०२३ ला रायगडावर साजरा झालेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सोहळा संपूर्ण जगाने अनुभवला. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे ब्रिटनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याची जिद्द त्यांनी बाळगली. सातत्याने पाठपुरावा करून ब्रिटन सरकारसोबत त्यांनी सामंजस्य करार देखील केला. यासोबतच जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे मराठा इन्फन्ट्री सैन्य दलाच्या सहकार्याने 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले.

# फलटण शहरासाठी २० कोटींचा निधी मंजूर

## ३८ महत्त्वपूर्ण कामे निधीमुळे मार्गी लागणार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** विधानपरिषदेचे माजी सभापती आमदार श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नाने फलटण शहरातील विविध विकास कामांसाठी राज्य शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून अजून ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर होणार असल्याची माहीती आमदार दिपकराव चव्हाण यांनी दिली.प्रभाग क्रमांक १० मधील ७ कामे या वैशिष्ट्यपूर्ण निधी मध्ये मंजूर झाली असून प्रभाग क्रमांक १० च्या नागरिकांच्या वतीने श्रीमंत रामराजे, श्रीमंत संजीवराजे, श्रीमंत रघूनाथराजे, आमदार दिपकराव चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. लक्ष्मीविलास पलेस येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार दिपकराव चव्हाण बोलत होते यावेळी जिल्हापरिषदेचे माजी अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर,श्रीमंत सुभद्राराजे नाईक निंबाळकर,माजी नगराध्यक्ष पांडूरंग गुंजवटे यांची प्रमुख उपस्थिती होती.
श्रीमंत संजीवराजे म्हणाले की , महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत फलटण नगरपरिषदेस २० कोटी रुपयांच्या निधी आणि कामे मंजूर करण्यात आली आहेत.
विधानपरिषदेचे माजी सभापती श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी हा निधी आणि कामे मंजूर केलेली असून फलटण शहरातील एकूण ३८ महत्त्वपूर्ण कामे या निधी मुळे मार्गी लागणार आहेत. तर प्रभाग क्रमांक १० मधील ७ कामे या वैशिष्ट्यपूर्ण निधी मध्ये मंजूर झाली असून यामध्ये नाथ मंदिर ते दिलिप पवार घर आणि हनुमाननगर काळोखेवस्ती पर्यंत पिण्याच्या पाण्याची वितरण नलिका बसवणे, संत बापूदासनगर कमान करणे, सम्राट जनरल स्टोअर शेजारील रस्ता, मंगलताई मठासमोरील रस्ता , बाजारे आणि डॉक्टर राजवैद्य घरासमोरील रस्सा, अहिंसा मैदानालगतचा रस्ता कॉंक्रिटिकरण करणे अशा ७ कामांचे लवकरच शुभारंभ करण्यात येणार आहे. प्रभाग क्रमांक १० च्या नागरिकांच्या वतीने श्रीमंत रामराजे, श्रीमंत संजीवराजे, श्रीमंत रघूनाथराजे,आमदार दिपकराव चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# दलितमित्र एम.जी. धिवरे यांना अखेरचा जयभीम

## दलित, आदिवासी, कामगारांचा बुलंद आवाज अनंतात विलीन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे सरचीटणीस तथा कामगार चळवळीचे नेते मन्साराम गणेश धिवरे अर्थात एम.जी. धिवरे यांचे दिनांक ६ मार्च २०२४ रोजी सकाळी ७ वाजता वृध्दापकाळाने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ लढवैय्या नेता हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. आज सायंकाळी ७ वाजता देवपूर येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यभरातून त्यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



एम.जी. धिवरे यांनी दलीत, आदिवासी, कष्टकरी, अल्पसंख्याक, शोषित पीडित समाजावरील अन्यायाविरोधात नेहमीच आवाज उठविला. प्रसंगी रस्त्यावर उतरून न्याय मिळवून दिला. दलित, आदिवासी, वंचित, कष्टकरी लोकांसाठी केलेल्या आंदोलनामुळे त्यांना अनेक वेळा जेल देखील भोगावी लागली मात्र त्याची त्यांनी कधीच परवा केली नाही. त्यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलने यशस्वी झाली. त्यामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग होता. वंचित, पिडीतांसाठी काम करताना ते विविध पदेही यशस्वीपणे सांभाळत होते.
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे सरचीटणीस, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कामगार संघटनेचे राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कर्मचारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य समन्वय समिती सदस्य अशी विविध पदे ते त्यांनी भूषविली. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना स दलीत मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी वीज वि कामगारांच्या हक्कासाठी अनेक आंदोलने केली. लढवैय्या नेता म्हणून ते साऱ्यांना परिचित होते. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी समाजातील झुंजार नेता हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.
त्यांच्या या दुःखद निधनाने राजकीय सामाजिक शैक्षणिक क्रीडा सर्व क्षेत्रामधील सरांनी दुःख व्यक्त केले यावेळी धुळे दौऱ्यावर आलेले आमदार तथा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोळे यांनी देखील आज त्यांच्या दुःखद निधनाची बातमी मिळाल्यानंतर त्यांनी लागलीच आपला दौऱ्यातून वेळ काढून त्यांच्या घरी धावती भेट दिली. दरम्यान खासदार डॉ. सुभाष भामरे, धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील, माजी आमदार अनिल गोटे, धुळे ग्रामीणचे माजी आमदार शरद पाटील, आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते वाल्मिक दामोदर, चाळीसगाव चे माजी आमदार जाधव साहेब, बाबा हातेकर, शशिकांत वाघ, दोंडाईचा चे नगरसेवक रामभाऊ माणिक, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ, शंकर खरात, डॉ. नागसेन बागुल, ॲड. विशाल साळवे, आनंद लोंढे, किरण गायकवाड, माजी नगरसेवक अनिल दामोदर, माजी नगरसेवक नागसेन बोरसे, सिद्धार्थ जगदेव, माजी नगरसेवक योगेश इशी, माजी नगरसेवक सुनील बैसाणे, विशाल पगारे, सिद्धार्थ वाघ, किरण ईशी, मुकेश खरात, विजय खरात, बबलू खरात, बॉबी नागमल यांच्यासह अनेक विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या अंत्यात्रेत हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते.

# प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या जिल्हा अध्यक्षपदी सतीश लोखंडे यांची फेरनिवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी दैनिक युवक आधार या वृत्तपत्राचे पत्रकार सतिश लोखंडे यांनी उत्कृष्ट कार्य केल्यामुळे त्यांची फेर निवड करण्यात आली आहे. सतिश लोखंडे पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असून त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



सतिश लोखंडे संघाच्या नियमांचे अधीन राहून, संघ बळकटीकरण व संघाची ध्येयधोरणे पूर्णत्वास नेण्यासाठी अधिक प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संघाचे संस्थापक अध्यक्ष डी. टी. आंबेगावे, मंत्रालय व विधिमंडळ प्रमुख पंडित मोहिते- पाटील राज्य महिला अध्यक्षा डॉ. सुधाताई कांबळे, राज्य सांस्कृतिक प्रमुख प्रशांत विलणकर, राज्य उपाध्यक्ष पंकज वानखेडे विनायक सोळसे, महेश जाधव, विशाल पवार, राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राजू जाधव, दशरथ अडसूळ, अशोक इंगवले, साईनाथ जाधव, नवनाथ कापले, शमशुद्दीन शेख, राज्य कोषाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, युवा राज्याध्यक्ष डॉ. नितीन शिंदे, युवा कार्याध्यक्ष प्रशांत राजगुरू, विदर्भ अध्यक्ष केशव सवळकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष चिंधे, कार्याध्यक्ष शशिकांत पोरे, संपर्क प्रमुख जय कराडे, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमती व्याहाळकर, कार्याध्यक्ष हुकूमत मुलाणी, संपर्क प्रमुख आनंद भालेराव, संघटक बापू गायकर, कोकण अध्यक्ष जयप्रकाश पवार, संपर्क प्रमुख संतोष वाव्हळ, कोकण महिलाध्यक्षा दीपिकाताई चिपळूणकर, कोकण संघटक श्रीराम कदम, कोकण उपाध्यक्ष योगेश भामरे, कायदेविषयक सल्लागार ॲड. अमोल सकट, ॲड. रत्नाकर पाटील, ॲड.जितेंद्र पाटील, ॲड परेश जाधव, राज्य सल्लागार प्राचार्य डॉ वसंत बिरादार, विठ्ठल शिंदे, उपसंपादक गोकुळसिंग राजपूत सोयगाव,महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व तालुका पदाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या.



8 मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पाठक मंगल कार्यालय येथे सविता बाबासाहेब शेळके यांनी जालना जिल्ह्यात एक विशेष कार्य केल्याबद्दल महिला मधून विशेष कार्य केल्याबद्दल त्यांची जालना जिल्हाधिकारी साहेब व जिल्हा पोलीस अधीक्षक साहेब यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# योगेश सावंत यांच्या पोलीस कोठडीचे आदेश रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई** गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान असलेली चित्रफित सर्वदूर केल्याप्रकरणी अटकेत असलेले शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या समाजमाध्यम विभागाचे उपाध्यक्ष योगेश सावंत यांना सत्र न्यायालयाने सुनावलेली पोलीस कोठडी उच्च न्यायालयाने बुधवारी रद्द केली. अटकेनंतर सावंत यांना कनिष्ठ न्यायालयाने पोलीस कोठडी न सुनावता न्यायालयीन कोठडी सुनावली होती. या निर्णयाला पोलिसांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावेळी, सत्र न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करून सावंत यांना पोलीस कोठडी सुनावली होती. मात्र, आपली बाजू न ऐकताच सत्र न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावल्याचा दावा करून सावंत यांनी पत्नी आदिती यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, पोलीस कोठडीचा आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांनी सावंत यांची याचिका योग्य ठरवून त्यांची पोलीस कोठडी रद्द करण्याचे आदेश दिले. सावंत यांची न्यायालयीन कोठडीतून पोलीस कोठडीत रवानगी करण्याचा आदेश हा सुनावणीविना देण्यात आला. त्यामुळे, हा आदेश कायद्याच्या चौकटीत बसणारा नसल्याचे न्यायालयाने तो रद्द करताना स्पष्ट केले.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; तरुण फरार

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई परिसरातील 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी सोनई महाविद्यालयतुन सायकलवर वंजार वाड़ी शिवारात राहणारी घरी जाताना 4 तरुणानी सायकलला मोटर सायकल अडवी लाउन लज्जा उत्पन्न होईल असे कृत्या करुन आरोपी न.1ने मुलीचा हात धरुन तु मला खुप आवडते म्हणाला, आरोपी न.4 याने हात धरुन तो फिर्यादिला म्हणाला की, आरोपी न.1 हा तुज्यावर खुप प्रेम करतो तु त्याला नकार देऊ नकोस, असे म्हणाला, त्यावेळी फीर्यादि ही तिथुन निघून जात असताना आरोपी न.3 याने फिरयादीस ढकलून दिले. तसेच आरोपी न.2 याने फिरयादिची सायकल ढकलून दिली.फीर्यादि हिच्या तक्रारी वरून 46/2024 भादवी. क्र.354(अ )(ड,)341, पोक्सो का. क्र.7,.8,11,12, प्रमाणे सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार असून या घटनने खलबळ उडाली आहे, अधिक तपास सपोनी. आशिष शेळके करत आहे. या घटनेला एक महीना उलटाला तरीही आरोपीना अटक करण्यास पोलिस अपयशी ठरले आहे.

# कारागृह हे सुधारगृह व्हावे : मुनगंटीवार

## वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थानाचे भूमिपूजन व बॅरेकचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** कारागृहात राहणे, ही म्हटले तर शिक्षा आहे आणि एका दृष्टीने दीक्षाही आहे. वाल्याचा वाल्मिकी झाल्याची कथा सर्वांनी ऐकली आहे. आज तुम्ही सारे आंधारात आहात, कदाचित चांगल्या वर्तणुकीने उद्या प्रकाशात याल. बाहेर आल्यानंतर तुमच्या हातून उत्तम काम व्हावे, यासाठी हे केवळ कारागृह न राहता सुधारगृह व्हावे, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

जिल्हा कारागृह येथे वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थानाचे भूमिपूजन व महिला – पुरुष बंदीसाठी स्वतंत्र बॅरेक्सचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. यावेळी कारागृहाचे अधिक्षक अनुपकुमार कुमरे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, अभियंता श्री. येरगुडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. मंगेश गुलवाडे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी सतिश सोनवणे, नागेश कांबळे, तुरुंगअधिकारी महेश माळी, जनरल सुभेदार महेंद्र हिरोळे आदी उपस्थित होते.

येथील निवासस्थान व इतर सुविधांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून 2 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, क्षमतेपेक्षा जास्त संख्या या कारागृहात आहे. चार वर्षांपूर्वी येथील व्यवस्थेची पाहणी केली असता विविध सोयीसुविधांसाठी 14 कोटी रुपये दिले. हा केवळ तुरुंग न राहता हे सुधार केंद्र व्हावे, यासाठी 33 कोटींची मागणी करण्यात आली आहे. कारागृहाची क्षमता 486 असून सद्यस्थितीत येथे 720 कैदी आहेत. त्यामुळे क्षमतेमध्ये तसेच सोयीसुविधांमध्ये वाढ करण्याच्या सुचना प्रशसनाला दिल्या आहेत.

पुढे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, येथे वाचनालय आणि खेळाचे प्रकार आहेत. कैद्यांना वाचण्यासाठी उत्तमातीत उत्तम पुस्तके आपण स्वतःच्या निधीमधून देण्यासाठी तयार आहोत. प्रत्येकाच्या मनात द्वंद सुरू असते. त्यामुळे चांगली आणि दर्जेदार पुस्तके वाचली तर मनातील द्वंद संपुष्टात येऊ शकते. या कारागृहात आयुष्याचे तत्व शिकण्याचे, उत्तम संस्काराचे शिक्षण मिळावे, अशी अपेक्षा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी कारागृह परिसरात असलेल्या हजरत मखदुम शहाबुद्दीन शहा यांच्या दर्ग्याला भेट देऊन पाहणी केली. तसेच चादर चढवून प्रार्थना सुद्धा केली. सोबतच कारागृहाच्या नवीन बराकीचे आणि येथे कैद्यांसाठी नव्याने बांधलेल्या रुग्णालयाचे उद्घाटन पालकमंत्री मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर जिल्हा कारागृहात 500 बंद्यांकरीता नवीन बॅरेक्सचे बांधकाम व अन्य अनुषंगिक कामांतर्गत पुरुष बंद्यांकरीता 2 बॅरेक इमारतींचे बांधकाम, महिला बंद्यांकरीता बॅरेक इमारत, पुरुष विभक्त बंदी कक्ष, महिला विभक्त बंदी कक्ष, दवाखाना, तपासणी कक्ष, पुरुष कक्ष, महिला कक्ष, औषध भांडार आदी कामे करण्यात आली आहेत.

# कांबी ते पिंप्रीराजा पायी दिंडीचे शनिवारी प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**नरहरी शहाणे**

**शेवगाव :** तालुक्यातील कांबी येथील श्रीसद्गुरू विश्वासनंद महाराजांच्या 111 व्या संजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त कांबी ते पिंप्रीराजा पायी दिंडी सोहळ्याचे शनिवारी दि 9 मार्च रोजी कांबी येथून प्रस्थान होणार आहे. पहिला मुक्काम नांदर येथे होईल नांदर येथे विश्वासनंद महाराज यांची गावातून मिरवणूक व आरती होईल, सायं गणेश महाराज गाडे यांचे किर्तन होईल साकाळी पालखी सोहळा मार्गस्थ होऊन खादगाव या ठिकाणी पोहचेल दुपारी कृष्णा महाराज कुऱ्हे यांचे किर्तन होईल. संध्याकाळी अडुळ येथे विक्रम महाराज पुरी यांचे किर्तन होईल. सकाळी सोहळा पिंपरीराजा येथे पोहचेल. बीजेनिमित्त विश्वासनंद मठाचे महंत प्रल्हादनंद गिरी महाराज्यांच्या हस्ते श्रीविश्वासनंद महाराज समाधी अभिषेक होईल. तसेच रामेश्वर महाराज देशमुख यांचा संगीत भजनांचा कार्यक्रम होईल व आरती होऊन महाप्रसादाचा कार्यक्रम होईल संध्याकाळी किशोर महाराज भिसे यांचे किर्तन व सुवर्णाताई गिरी व वैजिनाथ कोकाटे यांचे भजन होईल.

दुसऱ्या दिवशी सकाळी दत्तात्रय महाराज बोरकर यांचे किर्तन व गणेश महाराज आव्हाड यांचे संगीत भजन होऊन पालखी सोहळ्याची पिंपरीराजा येथे नगर प्रदक्षिणा होईल. संध्याकाळी हिंदू मुस्लिम एक्याचे प्रतीक वैष्णववीर कबीर महाराज आत्तार यांचे किर्तन होईल व गणेश महाराज परिहार यांचा भजनाचा कार्यक्रम होईल दि. 13 रोजी भाऊसाहेब महाराज पन्हाळकर यांच्या काल्याच्या किर्तनानंतर पालखी सोहळा पुन्हा कांबी कडे मार्गस्थ होईल. परतीच्या प्रवासात खादगाव या ठिकाणी संध्याकाळी अशोक महाराज पुरी यांचे किर्तन होईल व सकाळी पालखी सोहळा कांबी च्या दिशेने मार्गस्थ होईल व संध्याकाळी कांबी येथे पालखीची भव्यदिव्य नगर प्रदक्षिणा होईल व पालखी सोहळा संपन्न होईल, अशी माहिती मठाचे महंत प्रल्हादनंद गिरी व संस्थानच्या वतीने दिली.

# मुंबई महानगरपालिका भ्रष्टाचाराचे आगार

## निविदा प्रक्रिया थांबविण्याची वडेट्टीवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महानगरपालिका भ्रष्टाचाराचे आगार बनले आहे. लोकनियुक्त सदस्य महापालिकेत नसल्याचा फायदा घेत काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई साफ करण्याचा उद्योग सुरू केला आहे. निविदा प्रक्रियेबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करुन रस्ते विकासाच्या निविदा अंतिम केल्याचे 700 कोटींच्या घोटाळ्याचे प्रकरण आता समोर आले आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार सरकारने शोधला पाहिजे, अन्यथा जनतेच्या पैशावर डल्ला मारण्याचा हा उद्योग सरकारच्या आशिर्वादाने सुरूच राहणार, असा जोरदार हल्लाबोल करत विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराला पुन्हा वाचा फोडली आहे. त्याचबरोबर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून ही रस्ते विकास निविदा प्रक्रिया थांबण्याची मागणी श्री. वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाने 700 कोटी रुपयांचे कंत्राट निविदा प्रक्रियेबाबतच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन अंतिम केले आहे. एम. एम. आर. डी.ए.ने पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यानंतर दोन्ही महामार्गावरील प्रवेश नियंत्रण प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गवर एक जंक्शन आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर तीन जंक्शन यांची सुधारणा करण्याच्या कामासाठी महापालिकेने तातडीने निविदा मागवल्या होत्या.

प्राप्त निविदा 28 फेब्रुवारी, 2024 रोजी उघडण्यात आल्या. या निविदेत प्रशासकीय अंदाजित दराच्या तुलनेत सात टक्के अधिक दराने सुमारे 758 कोटी रुपयांमध्ये बोली लावणाऱ्या आर.पी.एस.इन्फ्रा प्रोजेक्ट या कंपनीला पात्र ठरवण्यात आले. निविदा 28 फेब्रुवारी, 2024 रोजी उघडण्यात आल्यानंतर लेखा (वित्त) विभाग आणि उपायुक्त (पायाभूत सेवा) यांनी मंजुरी देण्याचे काम एका दिवसात पार पाडले. त्यानंतर 29 फेब्रुवारी, 2024 रोजी रस्ते विभागाने अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांच्या स्वाक्षरीने आयुक्तांच्या मंजुरीला हा प्रस्ताव पाठवला. कार्यादेश बजावण्याची कार्यवाही रस्ते विभागाकडून तात्काळ होणार आहे.

मुंबई महानगरपालिकेतील निविदा अंतिम करण्याबाबतच्या कार्यवाहीचा इतिहास बघितला तर प्रशासकीय मंजुरीचा मसुदा बनवायला काही महिने लागतात. या प्रकरणात मात्र निविदा उघडल्यानंतर एका दिवसात दोन विभागांनी छाननी करुन अंतिम प्रस्ताव आयुक्तांच्या मंजुरीसाठी पाठविण्याची केलेली कार्यवाही संशयास्पद असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, लोकसभेची आचारसंहिता येत्या काही दिवसात लागणार आहे. महापालिकेचे अनेक अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूकीच्या कामासाठी पाठविण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत एवढ्या जलदगतीने कार्यवाही करणे संयुक्तिक नव्हते. आयुक्तांनी अर्थसंकल्पात या कामाबाबतचा उल्लेख केला होता. त्यानंतर काही महिन्यांचा काळ गेला. ही कार्यवाही या काळात महापालिकेला करता आली असती. एवढा काळ वाया घालवून नियम धाब्यावर बसवून 700 कोटी रुपयांच्या मोठ्या कामाची निविदा अंतिम करण्याची कार्यवाही महापालिकेकडून केली गेली आहे.

ही अतिशय गंभीर व संशयास्पद बाब आहे. त्यामुळे याबाबतची चौकशी करण्याबाबतचे आदेश देऊन वर्क ऑर्डर देण्याची कार्यवाही थांबवावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# भोकर नगर परिषदेची ७५ टक्के वसूली

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील नगरपरीषदेच्या वसुली विभागामार्फत थकबाकी दारांकडे वसुलीपोटी धडक मोहीम राबविण्यात आली असून मोहिमेज्ञअंतर्गत शहरातील विविध ठिकाणच्या थकीत मालमत्तां धारकांना भेट देवून वसुली करण्यात आली. यावेळी १,१५,३३,९८० रुपये वसूल करण्यात आल्याची माहिती नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी तथा प्रशासक अनुपमसिंह यादव यांनी दिली आहे.



शहरातील वसुली मोहीम यापुढे तीव्र स्वरूपात राबविण्यात येणार आहे. सर्व थकबाकीदार मालमत्ताधारक व नळ कनेक्शनधारक, व्यावसायिक, दुकानदार, व्यापारी यांनी आपल्याकडे असणारी मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी त्वरित नगरपरिषद कार्यालयात जमा करावी व मालमत्ता जप्त करणे, सील करणे, नळ कनेक्शन खंडित करणे या प्रकारची कटू कारवाई टाळावी येणाऱ्या २६ मार्च पर्यंत संपूर्ण थकबाकी न भरल्यास थकबाकीदारांची नावे शहरातील मुख्य चौकात फ्लेक्स बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्ताधारक व नळ कनेक्शनधारकानी आपल्याकडे असणारी कराची रक्कम त्वरित भरणा करावी, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधीकारी यादव यांनी केले आहे. मोहीमेत कर निरीक्षक प्रकाश तोटालू, जावेद ईनामदार, साहेबराव मोरे, आशोक डोंगरे,दत्ता अनंतवार, रवी महाबळे, सचिन वैष्णव, सुनिल कल्यानकर, संतोष पांचाळ, कमलाकर भगत, संदेश दांडगे, सुरेश मेहनतकर, सुरज आरपले यांच्या सह वसुली विभागातील इतर सहायक कर्मचारी यांचा समावेश आहे. नागरीकांनी मार्च एन्डींगपूर्वी मालमत्ता व पाणीपट्टी कराचा भरणा करावा. अन्यथा थकीत करापोटी नगरपरिषद प्रशासनाकडून मालमत्ता जप्तीची कारवाई केली जाईल, जप्तीसारखी अप्रीय घटना टाळण्यासाठी वेळेत कराचा भरणा करून नगरपरिषद प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन यादव यांनी केले आहे.

# हा पुरस्कार बळ देणारा आहे : दशरथ ननावरे

## शिवसमर्थ पुरस्काराने दशरथ ननावरे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मातृभूमीमध्ये मनुष्य जन्मतो मात्र कर्मभूमीमध्ये तो घडतो. या कर्मभूमीतून मिळालेला हा पुरस्कार बळ देणारा आहे. अतिशय बिकट परिस्थितीत येथे लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली. या संघर्षमय काळातही लोकसेवेचं व्रत जोपासलं. प्रामाणिक सेवेचं हे फळ घरच्या लोकांनी केलेल्या सत्कारासम आहे. पुढील काळातही हे समाजसेवेचं व्रत कायम जोपासणार आहे. असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांनी केले. ते सडादाढोली पाटण येथे रामघळ कुबडीतीर्थ ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवसमर्थ पुरस्कार वितरण समारंभ कार्यक्रमात बोलत होते.यावेळी दशरथ ननावरे यांना यंदाचा शिवसमर्थ पुरस्कार बहाल करण्यात आलेला असून हा पुरस्कार बळ देणारा आहे, अशी भावना दशरथ ननावरे यांनी व्यक्त केली. मानपत्र, सन्मानचिन्ह हे संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांच्या सह ट्रस्टचे अध्यक्ष चिमाजी झोरे,कार्याध्यक्ष नथुराम झोरे, सचिव सीताराम झोरे,धोंडीबा झोरे,बाबूराव झोरे,बहिरु झोरे, विठ्ठल झोरे,प्रा.जानू झोरे,वैभव झोरे आदीं सह इतर उपस्थित होते.संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांनी मनोगत व्यक्त करत असताना इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांचे विशेष कौतुक केले.समाजासाठी अव्याहतपणे काम करणे हा सामाजिक कार्यकर्त्याचा स्थायीभाव असतो.समाजप्रबोधन हे लोकसेवेचे एक प्रभावी अंग आहे.शैक्षणिक कार्याबरोबर समाज प्रबोधनात दशरथ ननावरे यांचे मोठे योगदान आहे.त्यामुळेच राज्यातील नावाजलेल्या वक्त्यांमध्ये त्यांची गणना होते. इतिहास अभ्यासक म्हणून त्यांनी केलेले काम प्रेरक आहे.शिवसमर्थ पुरस्कारामुळे त्यांना पुढील काळातील कामासाठी बळ मिळेल. असा विश्वास संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांनी व्यक्त केला.संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर पुढे म्हणाले की,सामाजिक,शैक्षणिक आणि ऐतिहासिक क्षेत्रात त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. समाजप्रबोधनाच्या माध्यमातून जनजागृती करून तरुण पिढीला विधायक मार्गावर आणण्यासाठी त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्रात शिवचरित्र आणि सामाजिक विषयावरील व्याख्यांनातून समाज घडविण्याचा त्यांचा अखंड प्रयत्न राहिला आहे.तसेच शेकडो गडकिल्ल्यांच्या मोहिमेतून अभ्यासपूर्ण लेखन तसेच शिवचरित्रावरील प्रासंगिक लेखन करून समाजजागृती केली आहे.त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे, असे सुद्धा त्यांनी त्यांचे कौतुक करताना म्हटले.

# गावकरी आणि पोलिसांनी काढली दारूविक्रेत्याची वरात

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** गाव करी ते राव न करी, असे म्हणतात. त्याचाच प्रत्यय आचार्य विनोबा भावे यांच्या पवनार गावात आला. गांधी, विनोबा भावेंच्या जिल्ह्यात दारूबंदी असली तरी येथे दारूचा महापूर वाहू लागल्याने गावकरी त्रस्त झाले होते. त्या अनुषंगाने मग ग्रामपंचायत सभागृहात बैठक घेण्यात आली. विषारी दारू पिल्याने गावात गेल्या पाच महिन्यांत चार युवकांचा बळी गेल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला. तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून पोलीस काय करतात, असा संतप्त सवाल महिलांनी उपस्थित केला. देशी-विदेशीसह हातभट्टीची विषारी दारू विकल्या जाते, त्यास आवर कोण घालणार? असा सवाल झाला. पत्रकारांना बातमी दिली म्हणून धमक्या येतात. या तक्रारी ऐकून सभेत उपस्थित पोलीस निरीक्षक विनीत घागे यांनी दिलगिरी व्यक्त केली.

# धर्माबाद तालुक्याच्या विकासाला बसली खीळ

## एका ग्रामसेवकांवर चार गावांचा भार; सामान्य नागरिकांची कामे खोळंबली

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील गावांच्या तुलनेत ग्रामसेवकांची संख्या अपुरी असल्यामुळे प्रत्येक ग्रामसेवकावर तीन-चार गावांच्या कारभाराची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामसेवकांवर अतिरिक्त ताण वाढला असून गावातील विकास कामावर त्याचा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामस्थांतून नाराजी व्यक्त होत आहे.

धर्माबाद तालुक्यात एकूण 45 ग्रामपंचायती व 52 गावे आहेत. ग्रामविकास अधिकाऱ्यांची 4 पदे मंजूर आहेत. 3 कार्यरत असून 1 रिक्त आहे. ग्रामसेवकांची 34 पदे मंजूर असून 16 कार्यरत आहेत तर 2 कंत्राटी ग्रामसेवक कार्यरत असून 16 ग्रामसेवक पदे रिक्त आहेत. ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांची असे एकूण 38 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 21 कार्यरत असून एकूण 17 रिक्त पदे आहेत. तालुक्यात 45 ग्रामपंचायती 52 गावे असल्याने एका ग्रामसेवकाकडे तीन ते चार ग्रामपंचायतीचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.

एकाच ग्रामसेवकांवर विविध गावांचा पदभार असल्याने प्रत्येक गावासाठी वेळ द्यावा लागत आहे. त्यामुळे कामाचा ताण वाढला आहे. मूळ पदभारासह 15 किलोमीटर दूर असलेल्या ग्रामपंचायतीची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे तेथील विकास कामावर परिणाम होत असल्याने तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे आम्ही एक किंवा दोन गावे पाहू शकतो. मात्र तीन ते चार गावांचा कारभार पहावा लागत असल्याने धावपळ होत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी ग्रामसेवकांतून करण्यात येत आहे.

तालुक्यात एकूण 45 ग्रामपंचायती 52 गावे असून त्या तुलनेत ग्रामसेवकांची संख्या कमी आहे. त्यामुळे अतिरिक्त ताण पडत आहे. एक ग्रामपंचायत एक ग्रामसेवक अशी व्यवस्था निर्माण करावी. त्यामुळे गावातील नागरिकांची कामे वेळेत




होतील. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामीण भागात वेळेत आणि प्रभावीपणे राबविल्या जातील. ग्रामसेवकांना होणारा मानसिक तानही कमी होईल.

> ग्रामपंचायत येथील प्रशासकीय कामे सोयीस्कर व्हावीत यासाठी रिक्त पदांबाबत शासनाकडे दोन-तीन महिन्याला माहिती सादर करण्यात येत असते. मंजूर पदे भरणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रशासकीय कामकाज ग्रामपंचायतीला सोईस्कर होईल.
> **- अजिंक्य सूर्यवंशी, गटविकास अधिकारी धर्माबाद.**
>
> "एका ग्रामसेवकांवर तीन-चार गावांचा भार असल्याने परिणामी गावातील विकासाला खीळ बसलेली दिसून येत आहे. तसेच काही गावातील ग्रामसेवक आठ-आठ दिवस ग्रामपंचायतीकडे फिरकत सुद्धा नाहीत.
> **- गणेश गिरी, उपजिल्हा प्रमुख शिवसेना उद्धव ठाकरे गट.**



# खंडाळा तालुका भूषण पुरस्काराने हरीश पाटणे यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पत्रकारितेच्या माध्यमातून खंडाळा तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण सातारा जिल्ह्यातील प्रश्न आणि समस्या अगदी रोखठोकपणे मांडणारे व उल्लेखनीय आणि नावलौकिक अशी कामगिरी करणारे खंडाळा तालुक्याचे सुपुत्र हरिष पाटणे यांना नुकताच खंडाळा तालुका भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे. हा पुरस्कार खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा यांच्या वतीने देण्यात आला.संस्थापक शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल हरिष पाटणे यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.पत्रकारिता क्षेत्रच नव्हे तर विविध क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. राजेंद्र विद्यालया चा माजी विद्यार्थी हाच माझा सर्वोच्च सन्मान असल्याचे हरिष पाटणे यांनी म्हटलेले आहे.

यावेळी संस्थापक शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध गाढवे, उपाध्यक्ष सुरेश पवार, विशेष अतिथी पूजा पांगारे, मनिषा जाधव, डॉ. धनश्री भोसले, डॉ. तेजस्विनी खराते, हेमलता ठोंबरे, नंदाताई गायकवाड,पुष्पा खंडागळे, रेखा गाढवे, सविता जाधव, शिवाजीराव ढमाळ,प्राचार्य डॉ. हणमंत जाधव, प्राचार्य शब्बीर नालबंद, उपप्राचार्य डॉ.पाटणे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अनिकेत गायकवाड, राजेंद्र विदयालय व उच्च माध्यमिक विदयालय सर्व शिक्षक सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय सर्व प्राध्यापक, सर्व माध्यम पत्रकार कार्यालयीन कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी माजी विद्यार्थीनी पूजा पांगारे,मनीषा जाधव,डॉ. धनश्री भोसले, डॉ.तेजस्विनी खराते यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला.वार्षिक पारितोषिक वितरण आणि आरोग्य तपासणी शिबीर सुद्धा आयोजित करण्यात आले होते.विविध स्पर्धा आणि कौशल्य प्रशिक्षणात सहभाग घेतलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनीचे देखील कौतुक करण्यात आले. हरिष पाटणे म्हणाले की,आज मी जो आहे तो फक्त राजेंद्र विदयालया मूळे आहे.शंकरराव गाढवे सर आणि मातोश्री सुशिलाताई गाढवे यांनी मला विद्यार्थी म्हणून माझ्यावर वैचारिक संस्कार केले आणि मला उभं केलं म्हणून राजेंद्र विद्यालय चा विद्यार्थी हा माझा सर्वोच्च सन्मान आहे.असे सुद्धा त्यांनी म्हटले.संस्थापक शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध गाढवे यांनी सुद्धा हरिष पाटणे यांचे विशेष कौतूक केले.हरिष पाटणे यांनी तालुक्याचा व विद्यालयाचा नावलौकिक आणखी वाढवावा. अशी अपेक्षा शंकरराव गाढवे यांनी व्यक्त केली.

तसेच हरिष पाटणे यांचा आदर्श तालुक्यातील व विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी घ्यावा, अशी भावना संस्थेचे सचिव अनिरुद्ध गाढवे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.प्रतिभा पाटणे, आभार प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, सूत्रसंचालन प्रा. स्नेहल शिंदे यांनी केले. हा समारंभ यशस्वी होण्यासाठी प्रा. अमीर इनामदार, प्रा.व्ही एन गाढवे यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयाने तालुक्यात पटकावला तिसरा क्रमांक

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज महाविद्यालयांमध्ये राज्यातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" हे अभियान दिनांक 1 जानेवारी 2024 ते दिनांक15 फेब्रुवारी 2024 या 45 दिवसाच्या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानाचा अधिक प्रभावी विस्तार होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्ता, अध्ययन/ अध्यापन/ प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगल्या आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना ,व्यवसाय शिक्षणाची तोंड ओळख, अंगभूत कला -क्रीडा गुणांचा विकास इत्यादी निकषांच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांकडून महाविद्यालयाची तपासणी करण्यात आली होती.

या अभियानात ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयाचा खुलताबाद तालुक्यात तिसरा क्रमांक आला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष व सचिव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले.



# रमजान महिन्यात महावितरण कंपनीने लोडशेडिंग करू नये

## मुस्लिम बांधवांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** रमजान महिन्यात महावितरण कंपनी लोडशेडींग व लपंडाव करू नये मुस्लिम बांधवांची मागणी. येत्या 12 मार्चपासून रमजान महिना सुरू होत आहे. हा मुस्लिमबांधवांचा पवित्र महिना असतो. पहाटेच उठून उपवासाची तयारी करावी लागते. यामुळे या महिन्यात महावितरण विद्युत कंपनी लोडशेडींग करू नये, अशी मागणी मुस्लिम शिष्ट मंडळाने धर्माबाद महावितरण कंपनीचे अभियंता ,विनायक ढवळे व अभियंता रवी धोटे, यांच्याकडे केली आहे. धर्माबाद तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, या कालावधीत लोडशेडिंग करू नये व मोहल्लामधील सर्व पथदीप बंद आहेत, ते त्वरित सुरू करावेत, संपूर्ण धर्माबाद तालुक्यात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवावा अशी मागणी नगरपरिषद मुख्याधिकारी सतिष पुदाके यांच्याकडे केली जात आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुरक्षागृहाची उभारणी त्वरित व्हावी : अंनिस

आधुनिक केसरी न्यूज



ऑनर किलींग रोखण्यासाठी महाराष्ट्रात सुरक्षागृह उभारण्यात यावेत अशी मागणी जातपंचायत मुठमाती अभियानाने वेळोवेळी राज्य सरकारकडे केली होती . त्याची घोषणा झाली परंतु प्रत्यक्षात ती अस्तित्वात यावी यासाठी पाठपुरावा चालू आहे . तशी जिल्हाधिकाऱ्याना विनंती करण्यात आली आहे . **कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, जातपंचायत मूठमाती अभियान, अंनिस**

**निफाड :** ऑनर कीलिंगची भिती असलेल्या जोडप्यांना प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सुरक्षागृहे उभारावीत असे राज्याच्या गृहखात्याने जाहीर करून तीन महिने उलटले तरीही अजुन पर्यंत सुरक्षागृह उभारली गेली नाहीत ती तत्काळ उभारण्यात यावी अशी मागणी जातपंचायत मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ऑनर किलिंग सारख्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी गृह खात्याकडून सरकारकडून पोलीस बंदोबस्त असलेले सुरक्षागृह उभारण्याचे जाहीर करण्यात आले आहे. जोडप्यांना तिथे निवासासोबत सुरक्षा पुरवली जाणार आहे. जरुरतीनुसार परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन एक वर्षापर्यंत सुरक्षागृह पुरविले जाणार असून ही सेवा नाममात्र शुल्क घेऊन पुरवली जाणार आहे. देशात ऑनर किलींग सारख्या घटना मोठ्या प्रमाणात समोर आल्या होत्या. भारतीय राज्य घटनेने व्यक्तीला दिलेल्या जीवितेच्या, स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या मुलभूत आधिकारावरच हा घाला असल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून राज्यांना सदर आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात यापुढे आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्यात जिल्हा समाजकल्याण आधिकाऱ्यांचा सदस्य म्हणून तर जिल्हा महिला बालकल्याण आधिकारी यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश असेल. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहासंदर्भात प्राप्त तक्रारींची दखल घेऊन हा कक्ष तत्काळ कार्यवाही करेल, असे गृह विभागाच्या आदेशात म्हटले आहे. पोलीसांच्या विशेष कक्षामार्फत केल्या जाणाऱ्या कारवाईचा तसेच न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक आढावा घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अक्षध्येखाली समिती असणार आहे. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना धमकी आल्यास व तशी तक्रार प्राप्त झाल्यास अप्पर पोलीस अधिक्षक दर्जाच्या आधिकाऱ्याने एका आठवड्याच्या आत तपास करुन अहवाल सादर करायचा आहे. पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याने तक्रार दाखल करून पुढील कार्यवाही करायची आहे. अशा जोडप्यांना संरक्षण द्यायचे आहे. विवाह इच्छुकांना आवश्यक सहाय्य करायचे आहे. जातपंचायत मुठमाती अभियानाकडे अनेक जोडप्यांची मदतीसाठी मागणी होत असल्याने अशी सुरक्षागृह व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे



# दहावीच्या इंग्रजी विषयाच्या पेपरला कॉपी देणाऱ्या टारगटांना पोलिसांनी केले टार्गेट

आधुनिक केसरी न्यूज

**अजय नजन**

**शेवगाव :** तालुक्यासह शहारात विविध शाळेत इयत्ता दहावीचे परिक्षा केंद्र असून अनेक विद्यार्थी दहावी व बारावीच्या परिक्षेस सामोरे जात आहे. आज इंग्रजी विषयाचा पेपर असल्या कारणाने गोंधळ होण्याची शक्यता असते. खबरदारीचा उपाय म्हणून शेवगांव पोलिस स्टेशनच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.यावेळी आबासाहेब काकडे विद्यालय शेवगांव या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी शेवगांव पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल बागुल गोपनीय शाखेचे संतोष वाघ पोलिस कॉस्टेबल हर्षल अंधाळे होमगार्ड पांडुरंग दहिफळे होमगार्ड विजय तुपविहरे उपस्थित होते.

# अंबरनाथ-कल्याण तालुक्यातील ढाब्यांवर पहाटेपर्यंत ओल्या पार्टींचा धिंगाणा !

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुंबईला नाईट लाईफला मंजुरी दिली. तत्कालीन माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी आग्रह धरला. उलट सुलट प्रतिक्रियांचा प्रहार झाला. मात्र ते उरलंसुरलं स्वप्न सध्या युती सरकार पूर्णत्वास नेत असल्याची चर्चा तालुका परिसरात घोगावू लागली आहे. बेकायदेशीर ढाब्यांवर पहाटेपर्यंत ओल्या पार्थ्यांचा धिंगाणा सुरू असल्याने गुन्हेगारी घटना सुद्धा पारावर येऊ लागल्या आहेत.

पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ अंतर्गत शहर-ग्रामीण परिसरात बेकायदेशीर ढाब्यांचे प्रमाण वाढत चालले असून पहाटेपर्यंत सुरू असलेल्या ओल्या पाटर्थ्यांकडे स्थानिक पोलिसांचा ' आखो देखा हाल' दुर्लक्ष असल्याने अवैध दारू विक्री देखील सुरू असल्याचा बोलबाला होऊ लागला आहे.उल्हासनगर परिमंडळ - ४ अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महामार्गाने हेरून रस्त्याच्या कडेला शासनाच्या नियमांना तिलांजली देऊन बेकायदेशीर ढाबे वाढत चालले आहेत. बेकायदेशीर विज, पाणी चोरून मस्तवाल ढाबे मालकांची अरेरावी वाढत चालली आहे. धाब्यावर खवय्यांना विनापरवाना सर्रास मध्य विक्री देखील होत असल्याने पहाटेपर्यंत या ढाब्यावर ओल्या पार्थ्यांचा धिंगाणा सुरू असल्याचे बोलले जात आहे. अंबरनाथ-बदलापूर-काटई मार्ग, पालेगाव ते खोणी फाटा तसेच खोणी फाटा ते उसाटणे परिसरातील बहुतांश ढाब्यांवर सर्रास अवैध मद्य विक्री सुरू आहे. चमचमीत खाद्यपदार्थाथांच्या चवीने खवय्यांना 'एकच प्याला'ची सोय हे ढाबेवाले करताना मोठ्या प्रमाणात विनापरवानगी सर्रास मद्य विक्री केली जात आहे. स्थानिक पोलिसांच्या बघ्याच्या भूमिकेकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने मुंबईतील पब, बारमध्ये नाईट लाईफ लाईन आता ग्रामीण परिसरात, राज्य महामार्गालगत जोमाने सुरू झाली आहे. त्यामुळे एक प्रकारे गुन्हेगारीला बळ मिळत असल्याने लूटपाट, हाणामारी, गंभीर गुन्ह्याच्या घटना वाढत असताना या अवैध धंदयांवर कोण अंकुश ठेवणार? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.



# संगीतमय शिवपुराण कथा कीर्तन सोहळ्यात कृषी विभागाने उघडली योजनांची गाठ

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बोधेगाव खुर्द येथे बुधवार रोजी खोलेश्वर संस्थान बोधेगाव खुर्द येथे पारंपारिक लोककलाकृतीच्या माध्यमातून ( अखंड हरिनाम सप्ताह संगीतमय शिवपुराण कथा कीर्तन सोहळ्यात ) कृषी विभागाच्या विविध योजना, उपक्रम, मोहिमांची यांची भारत कासार (तालुका कृषी अधिकारी), निवृत्ती जोरी ( मंडळ कृषी अधिकारी), बाळू गायकवाड (कृषी पर्यवेक्षक) यांच्या अध्यक्षतेखाली प्रितेश अजमेरा (कृषी सहाय्यक) यांनी महाडीबीटी पोर्टल वरील ठिबक व तुषार सिंचन योजना, यांत्रिकीकरण योजना , वैयक्तिक शेततळे, शेडनेट, कांदाचाळ, अस्तरीकरण, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना अशा प्रकारच्या इतर विविध योजनांची महाडीबीटी पोर्टल वर ज्या लाभार्थ्यांची निवड झाली त्यांच्या कागदपत्राच्या पूर्ततेपासून ते अनुदानापर्यंतची सर्व प्रक्रिया समजून सांगितली.

तसेच शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजने संदर्भात कागदपत्रांची शर्ती व अटींची माहिती सांगितली. या प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमात भानुदास साहेबराव तायडे (सरपंच), विनोद रामदास मोटे (उप सरपंच), भिकनराव सूर्यभान मोटे (चेअरमन), भागिनाथ लक्ष्मण मोटे ( पोलीस पाटील), राजू विठ्ठल मोठे( अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजक), भारत कासार (तालुका कृषी अधिकारी) , निवृत्ती जोरी (मंडळ कृषी अधिकारी), बाळू गायकवाड (कृषी पर्यवेक्षक) प्रितेश अजमेरा (कृषी सहाय्यक) आणि गावातील शेतकरी वर्ग उपस्थित होते.

# दोन दिवसांनंतर प्रा. साईबाबा कारागृहाबाहेर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नक्षली चळवळीशी संबंध असल्याचा आरोप असलेल्या प्रा. गोकलकोंडा नागा साईबाबा ऊर्फ जी.एन. साईबाबा व त्याच्या साथीदारांची आजन्म कारावासासह इतर शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रद्द केली व सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. आदेशाला दोन दिवस झाल्यानंतरही कागदपत्राची पूर्तता अभावी बुधवारी सुटका होऊ शकली नव्हती. मात्र गुरुवारी सकाळी ११ वाजता प्रा. साईबाबा कारागृहाबाहेर आले. त्यांची पत्नी, भाऊ, मित्र आणि वकील हे कार मधून साईबाबा यांना घराकडे रवाना झाले. ७ मार्च २०१७ रोजी गडचिरोली सत्र न्यायालयाने साईबाबासह महेश करिमन तिरकी, हेम केशवदत्ता मिश्रा, प्रशांत राही नारायण सांगलीकर, विजय नान तिरकी व पांडू पोरा नरोटे यांना दहशतवादी कट रचणे, दहशतवादी संघटनेला सहकार्य करणे, आदी गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवून जन्मठेपेसह विविध कालावधीच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. त्याविरुद्ध सर्व आरोपींनी उच्च न्यायालयात अपील केले होते. २०२२ साली न्या. रोहित देव आणि न्या. अनिल पानसरे यांच्या खंडपीठाने तांत्रिक कारणांवरून साईबाबांची निर्दोष सुटका केली होती. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करत गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेण्याची सूचना उच्च न्यायालयाला केली. यानंतर न्या. विनय जोशी आणि न्या. वाल्मीकी मेंनझेस यांच्या खंडपीठाकडे प्रकरण सोपवण्यात आले. अखेर मंगळवारी साईबाबा यांना निर्दोष सोडण्याचे आदेश न्यायालयाने दिले. दरम्यान, २५ ऑगस्ट २०२२ रोजी नरोटे याचा आजारपणामुळे मृत्यू झाला. त्यामुळे उच्च न्यायालयात केवळ उर्वरित आरोपींचे अपील विचारात घेण्यात आले. साईबाबा हे बुधवारी कारागृहातून सुटणार अशी अपेक्षा होती. मात्र, कारागृहात न्यायालयीन आदेश आणि अन्य कागदपत्र यांची पूर्तता झाली नव्हती. त्यामुळे दोन दिवसांनंतर म्हणजेच गुरुवारी सकाळी अकरा वाजता प्रा. साईबाबा कारागृहाबाहेर आले. पत्नी आणि भावाने त्यांना कार मध्ये बसवले आणि घराकडे रवाना झाले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर